बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १८३ वा । सोमवार दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### ज्वलनशिल पदार्थ व अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत हनुमंत रा. चिंचपुर ढगे ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.२६.०९.२०२५ रोजी किर्तेश्वर टायर्स व किराणा दुकान वालवड रोड चिंचपुर ढगे ता. भुम येथे विना परवाना बेकायदेशीर रित्या अत्यावश्यक वस्तु व ज्वलनशिल पदार्थ डिझेल पेट्रोल सदृश्य द्रव पदार्थ यामुळे मानवी जिवीतास संभाव्य धोक्यापासुन व कोणत्याही व्यक्तीला दुखापत किंवा क्षती पोचवण्याचा संभाव असले असे कृति करुन एकुण १५,७५६ किंमतीचा व महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ राजनिवास पान मसाला, हिरा पान मसाला, छोटा विमल पान मसाला, असा एकुण २५,७६३ किंमतीचे विक्री करीत जवळ बाळगलेला असताना मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तीविरुध्द भा.न्या. सं. कलम २८७, १२३, २७४,२७५, सह कलम ३, ७ अत्यावश्यकवस्तु अधिनियम, सहअन्न सुरक्षा मानके अधिनियम कलम २६ (२)(i),२६ (२)(iv),२७ (३)(डी), २७(३)(इ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजाभवानी मंदीर परिसरात पाकीट मारले

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुहास ज्योतीराव सुतार, वय ३८ वर्षे, रा. माळुंब्रा ता.तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२५.०९.२०२५ रोजी श्री तुळजाभवानी मंदीर देव दर्शनासाठी आले असता अज्ञात महिला व एक पुरुष यांनी श्री तुळजाभवानी मंदीर शहाजी महाद्वार समोर तुळजापूर येथे सुहास सुतार यांना धक्का देवून गर्दीचा फायदा घेवून पॅन्टचे पाठीमागील खिशातील पॉकेटमधील रोख रक्कम २,१०० जबरीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुहास सुतार यांनी दि.२५.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे कत्तल करुन विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- प्राण्यांना निर्दयपणे कत्तल धाराशिव शहर पोलीस ठाणे मैनोद्दीन , वय ३८ वर्षे, रा. फकीरा नगर वैराग नाका धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.२६.०९.२०२५ रोजी खिरणीमळा धाराशिव येथे अशोक लिलॅंड मालवाहक मध्ये २,५२० किलो ५,०४,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरांची कत्तल करुन जनावरांचे मांस विक्रीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तीविरुध्द प्राणी संरक्षण अधिनियम ५(सी), ९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## अतिवृष्टी बधितांना तुळजाभवानी मंदिर संस्थान रु.१ कोटी, तेरणा ट्रस्ट देणार रु. ५१ लाख

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकाराने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)धाराशिव जिल्ह्यात ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये झालेल्या अभूतपूर्व अशा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काढणीला आलेली पिके नष्ट झाली असून, शेतातील माती खरवडून गेली आहे. मोठ्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तुळजाभवानी मंदिर संस्थानने एक कोटी रुपये तर तेरणा ट्रस्टने ५१ लाख रुपयांची जाहीर केली आहे. ही रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात येणार आहे, अशी माहिती मित्रचे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

आमदार राणाजगजितसिंह पाटील हे तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्त आहेत. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मंदिर संस्थानच्या माध्यमातून मदत करण्याबाबत त्यांनी मंदिर संस्थानचे अध्यक्षांसोबत चर्चा केली होती व त्यानुसार शेतकऱ्यांसाठी एक कोटी रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याचा निर्णय झाला आहे. तेरणा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेतला जातो. संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठीही तेरणा ट्रस्टने धाव घेतली असून, ५१ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी निर्माण केल्या आहेत. पिके नष्ट झाली, अनेकांच्या घरांची पडझड झाली, संसारोपयोगी साहित्य वाहून गेले आहे. शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी दुग्धव्यवसाय करतात. या पशुधनाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर गदा आली आहे. हे लक्षात घेऊन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी मंदिर संस्थानकडे केली होती. यासह त्यांनी तेरणा ट्रस्टकडूनही मदत जाहीर केली आहे.

तुळजाभवानी मंदिर संस्थान अन्य मार्गांनीही आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करणार आहे. अनेकांच्या शेतातील माती खरडून गेली आहे. त्यामुळे जमिनीची सुपिकता नष्ट होण्याचा मोठा धोका आहे. यासह पशुधनाचे नुकसान झालेल्या, अन्य नुकसानीचा सामना करावा लागत असलेल्या शेतकऱ्यांना, नागरिकांना मंदिर संस्थानच्या वतीने थेट आर्थिक मदत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

**लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, उद्योगपती शेतकऱ्यांना मदत करावी–**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे. त्यामुळे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, ट्रस्ट, उद्योगपती व नागरिकांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची गरज आहे. यासाठी सर्वांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

## शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवात ‘शाहिरी परंपरा’



तुळजापूर (माध्यम कक्ष )- श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवात शुक्रवारी सुप्रसिद्ध शाहीर रामानंद उगले यांच्या ‘शाहिरी परंपरा’ या कार्यक्रमाने उपस्थित रसिक श्रोत्यांना खिळवून ठेवले.

शाहीर रामानंद उगले यांनी गोंधळ, वासुदेव,भजन आणि भारुड या पारंपरिक कलारूपांतून समाजजागृतीपर संदेश दिले.संतती नियमन,शिक्षण,आरोग्य या महत्वाच्या सामाजिक विषयांवर त्यांनी रंजक पद्धतीने प्रबोधन केले. याचबरोबर आपल्या शाहिरी पोवाड्यातून छत्रपती शिवाजी महाराजांचा थोर इतिहास श्रोत्यांसमोर उलगडला.कार्यक्रमाची सुरुवात तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे विश्वस्त अरविंद बोळंगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

या कार्यक्रमात नारीशक्तीचा गौरव म्हणून श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांच्या हस्ते सारिका रामेश्वर येळेकर यांचा सन्मान करण्यात आला.देवींची प्रतिमा, कवड्याची माळ, महावस्त्र आणि अकरा हजार रुपयांचा धनादेश देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सारिका येळेकर यांनी एका शेळीपासून शेती आणि दुग्धव्यवसायाची वाटचाल सुरू करून आज तब्बल ३७ शेळ्यांचा व्यवसाय उभा केला आहे. यासोबतच त्यांनी पीठाची गिरणी,मिरची कांडप यांसारखे लघुउद्योग सुरू करून स्वावलंबी जीवन जगण्याचा आदर्श घालून दिला आहे.त्यांच्या कार्याचा गौरव करून श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हा पोलिस अधीक्षक रितू खोकर, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांचा सत्कार तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे यांनी केला,तर पोलिस अधीक्षक रितू खोकर यांचा सत्कार उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख यांनी केला.

शाहिरी रंग,समाजजागृतीचे सूर आणि नारीशक्तीचा गौरव अशा बहारदार संगमाने शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवाचा आजचा दिवस संस्मरणीय ठरला.

## अतिवृष्टीत पिकांचे मोठे नुकसान : शेतकऱ्यांना पंचनाम्यासाठी फोटो देण्याची सक्ती नाही –जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार

धाराशिव,दि.२५ सप्टेंबर (जिमाका) धाराशिव जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम जिल्हा प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू आहे. शेतकऱ्यांनी पंचनाम्यासाठी स्वतंत्रपणे फोटो देण्याची सक्ती नसल्याचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात सलग दोन ते तीन दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावांमध्ये पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. काही भागात नद्या व नाल्यांना पूर आला असून,शेतजमिनी खरडून निघाल्या आहेत.या सर्व घटनेचा पंचनामा करण्याचे काम महसूल प्रशासन व शेती विभाग एकत्रितपणे करत आहेत. पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांना फोटो आणण्याची आवश्यकता नाही. शासनाकडून मिळणाऱ्या मदतीपासून कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही,यासाठी अधिकारी-कर्मचारी दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या असल्याचे जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी सांगितले. काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचे पंचनामे करताना शेतकऱ्यांकडून फोटोची मागणी होत असल्याचे लक्षात आल्याने याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.शेतकऱ्यांना फक्त नुकसानग्रस्त क्षेत्र दाखवायचे असून,पंचनाम्यासाठी पुरेसा पुरावा मिळवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे.

कोणत्याही प्रकारची फोटोसक्ती जिल्हा प्रशासनाने केलेली नाही. शेतकऱ्यांनी याबाबत गैरसमज बाळगू नये व पंचनाम्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

## रात्रगस्ती दरम्यान संशईत इसम ताब्यात

धाराशिव (प्रतिनिधी)- अंबी पोलीस ठाणे अंतर्गतअंबी पो. ठा.चे पथक दि.२५.०९.२०२५ रोजी अंबी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पथकास आनाळा बसस्थानक येथे आडोशाला अंधाराचा दबा धरुन बसलेले एक इसम दिसून आल्याने पथकास त्याचा संशय आल्याने पथकाने त्यास हाटकले. यावर त्याची विचारपुस केली असता त्यानी आपली -ज्ञानेश्वर रा. बिडसांगवी ता. आष्टी जि. बीड ह.मु. आनाळा ता. परंडा जि. धाराशिव असे सांगीतले. पोलीसांनी अशा रात्री अवेळी फिरण्याचे कारण विचारले असता त्यानी पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याने ते माला विरूध्द गुन्हा करण्याच्या उद्देशाने तेथे फिरत असल्याचा पोलीसांचा संशय बळावल्याने त्यास ताब्यात घेउन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र पोलिस कायदा कलम- १२२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्ह्यात ९ ऑक्टोबरपर्यंत मनाई आदेश

धाराशिव, (जिमाका) -येत्या शारदीय नवरात्र महोत्सव,गांधी जयंती,दसरा तसेच कोजागिरी व अश्विनी पौर्णिमा या काळात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने आणि आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.अपर जिल्हादंडाधिकारी शोभा जाधव यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१)(३) नुसार जारी केलेल्या आदेशानुसार,जिल्ह्यात २६ सप्टेंबर २०२५ रोजी पहाटे १ वाजेपासून ते ९ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरून) जमावबंदी व शस्त्रबंदी लागू राहणार आहे.

या आदेशानुसार पुढील बाबीस मनाई करण्यात आली आहे.यामध्ये शस्त्र,सोटे, काठ्या,तलवारी,बंदुका,दाहक पदार्थ व स्फोटके बाळगणे निषिद्ध.दगड साठवणे, फेकावयाची साधने तयार करणे किंवा बाळगणे मनाई.आवेशपूर्ण भाषणे, विडंबन,अश्लील किंवा भडक चित्रे, फलक,घोषणा टाळाव्यात. पाच किंवा त्याहून अधिक व्यक्तींचा जमाव परवानगीशिवाय एकत्र येऊ शकणार नाही. परवानगीशिवाय मोर्चे, मिरवणुका,सभा घेता येणार नाहीत.

या आदेशात पुढील बाबी अपवाद असतील.यामध्ये अंत्ययात्रा,धार्मिक विधी,लग्नसोहळे,सामाजिक सण व शासकीय कार्यक्रम,शासकीय सेवेत तैनात कर्मचारी,सिनेमागृहे व रंगमंचावरील कार्यक्रम,प्रतिबंधात्मक आदेशाच्या काळात सभा,मिरवणुका,निवडणूक प्रचारसभा आयोजित करण्यासाठी पोलीस अधीक्षक अथवा संबंधित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची लेखी परवानगी आवश्यक राहणार आहे.हा आदेश २५ सप्टेंबर रोजी अपर जिल्हादंडाधिकारी यांनी काढला आहे.

## उत्स्फूर्त प्रतिसादात सैनिकी विद्यालयाच्या प्रांगणात लोकसंगीताची शिवशंभो गर्जना



धाराशिव दि.२५ सप्टेंबर (माध्यम कक्ष) श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान आयोजित शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवातील तिसऱ्या दिवसाचा २४ सप्टेंबरचा कार्यक्रम लोकसंगीताच्या ठेक्यात पार पडला. अभिजीत जाधव आणि आमू जाधव यांच्या 'शिवशंभो गर्जना' या लोकसंगीत कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली.देवी तुळजाभवानीची आरती तसेच संबळ वादनाच्या सुरांनी भक्तिभावाचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाची सुरुवात पद्मश्री राहीबाई पोपेरे आणि जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली.प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिलेल्या पद्मश्री राहीबाई पोपेरे यांचा विशेष गौरव करण्यात आला.पारंपरिक बियाणांच्या वाणांचे जतन आणि संवर्धन,सेंद्रिय शेतीचा प्रसार तसेच ‘देशी बियाण्यांची बँक’ सुरू करून त्यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी उल्लेखनीय कार्य केले आहे.त्यांच्या या योगदानाची दखल घेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.त्यांच्या या कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार बहाल केला आहे. तसेच बीबीसीने त्यांना १०० प्रभावशाली महिलांमध्ये स्थान दिले असून त्या ‘बीज माता’ म्हणूनही परिचित आहेत.

या सांस्कृतिक महोत्सवात दररोज धाराशिव जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या एका महिलेचा सन्मान करण्यात येतो. तिसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमात आवळा उत्पादन निर्मितीत विशेष कार्य करणाऱ्या अनिता नामदेव देवकते यांचा श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा,कवड्याची माळ, महावस्त्र व अकरा हजार रुपयांचा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला.

लोकसंगीतकार अभिजीत जाधव आणि आमू जाधव यांचाही सत्कार करून त्यांच्या कलात्मक योगदानाचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला सहायक जिल्हाधिकारी तथा भूमचे उपविभागीय अधिकारी रेवैय्या डोंगरे, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,सौ. सौमय्याश्री पुजार, तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने,पाळीकर पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## भूम तालुक्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा: शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीचे आश्वासन



धाराशिव दि.२४ सप्टेंबर (जिमाका) अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीत शेतकऱ्यांचा कसूर नाही.शासन तातडीने नोंद घेऊन सर्वांना मदत करणारच, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.आज ते भूम तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाच्या पाहणीसाठी आले होते.

चिंचोली येथे नगररोडलगतच्या शेडमध्ये झालेल्या दुर्घटनेची माहिती त्यांनी घेतली.या दुर्घटनेत राहत्या शेडमध्ये पाणी शिरल्याने कै. देवनाबाई नवनाथ वारे यांचा मृत्यू झाला होता. श्री.पवार यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले आणि शासनामार्फत ४ लाख रुपयांचा मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

यानंतर चुबळी गोरमाळा येथील फुटलेल्या पाझर तलावामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची त्यांनी पाहणी केली.तसेच वालवड व पाटसांगवी येथील फुटलेले तलावही त्यांनी पाहिले.यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून कोणत्याही शेतकऱ्याला नुकसानभरपाईपासून वगळले जाणार नाही, असे स्पष्ट आश्वासन त्यांनी दिले.

तहसीलदार जयवंत पाटील यांना तात्काळ पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. पिके,जमीन, विहिरी,पशुधन तसेच जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान लवकरात लवकर भरून निघावे यासाठी ते प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.रेकॉर्ड जितक्या लवकर मिळतील तितक्या लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा केली जाईल, असे ते म्हणाले. दरम्यान, शेतकऱ्यांनी पूल दुरुस्ती व तातडीची मदत जाहीर करण्याच्या मागण्या केल्या.

यावेळी आमदार विक्रम काळे,माजी आमदार राहुल मोटे,महेंद्र धायगुडे, सुरेश बिराजदार,रणजित मोटे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## पावसाचे सर्वावरच संकट

राज्यात पावसाने सर्वावर संकट आणले आहे. शेतकऱ्यावर मोठे संकट आले आहेत. त्यांच्यावरील संकट कसे दुर करणार ही मोठी समस्या आहे. आतोनात शेतकऱ्यावर संकट कोसळले आहे. लवकरच शेतकरी उभारी घेईल असे वाटत नाही. शेती पुर्ण खरडून निसार्गाने घेवुन गेली आहे. शेतीतील उभे पीक, जमीनीतील माती, जनावरे, जे काही शेतात उभे आहे ते जवळपास नष्ट झाले आहे. राणात जर कोणी केले तर अतिषय दुःख होते. कारण मोठ्या कष्ठाने शेती केली जाते. सतत कष्ठ करणे हा शेतकऱ्याचा धर्म आहे. त्या धर्माचे असे प्रायश्चित्य मिळेल असे वाटले नव्हते. कारण यापुर्वी असे मोठे संकट आले नव्हते. ते आज उघड्या डोळयांनी पाहाण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यावर सतत संकट येतात तरी तो मोठ्या हिंमतीने मुकाबला करीत आला आहे. कधी शेतीमालास भाव नसतो. सोयाबिनला काढणीस जेवढा खर्च येतो तेवढा सुद्धा बाजारात भाव मिळत नाही ही वस्तूस्थिती आहे. तरी तो हारत नाही तो सतत कष्ठाने मुकाबला करीत आला आहे. असे असताना यावेळी मात्र पावसाने तेही परतीच्या पावसाने कहर केला आहे. दररोज पाऊस, नदी, नाले, बंधारे तुडुंब भरले आहेत. काही झाले तरी यावर मात करावी लागणार आहे. सरकार तसा प्रयत्न करीत आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांनी नकतेच पंतप्रधान यांची दिल्लीत भेट घेतली असून या निसर्गाच्या संकटावर मात करण्यासाठी आर्थिक मदत मागितल्याचे सांगितले जात आहे. निसर्ग हा कोपला आहे. बेसुमार पाऊस पडत आहे. यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे यात दुमत नाही, त्याच बरोबर सर्वात मोठे आणखीन नुकसान रस्ते, वीज व शालेय इमारतीचे झाले आहे. रस्ते उखडून निघाले आहे. मुळात शासकिय काम कसे असते, किती दर्जेदार असते याचा अनुभव राज्यातील जनतेला आहे. त्यामुळे रस्त्याचे नुकसान झाले असून दळणवळणासाठी रस्त्याची उभारणी तातडीने केली पाहिजे. यासाठी लागणारा निधीची उपलब्ध सरकारला करावी लागणार आहे. शाळा व वीज वितरण कंपनीचे नुकसान झाले. पोल आडवे पडले आहेत. काही डीपी पाण्यात आहेत. वीज पुरवठा खंडीत झाला असेल त्या ठिकाणी चालू करणे आवघड आहे. नवीन तारा ओढणे आवश्यक आहे. शाळाची आवस्था बिकट आहे. अगोदरच गळणाऱ्या शाळा आहे. छत असो किवा पत्रे हे पावसाने गळणारी आहेत. जूनला शाळा सुरू झाली की, तात्पुरती डागडुजी केली जाते. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस पडेल याची कल्पना कोणालाही नव्हती. जे जाणकार किंवा भविष्य जाणारे सुद्धा गप्प आहेत. निसर्गापुढे भुलथापास थारा नसतो हे ओळखले पाहिजे. त्यामुळे भविष्यकरणारे उघडे पडले आहे. आता निसर्गापुढे किंवा विज्ञानापुढे चालत नाही हेच ईश्वराने दाखवुन दिले आहे. मुळात निसर्गाची साथ दिली तर जीवनात सोने होते. नाही दिली तर भीख मागायाला लावते. त्यामुळे निसर्गाशी मैत्री केली पाहिजे, ऱ्हास नाही. हे ओळखले पाहिजे. आज जो परिणाम दिसून येत आहे तो निसर्गाचा परिणाम आहे. क्षणात पाणी-पाणी करू शकतो. कोपला तर पाण्याच्या एक-एक थेंबास तरसऊ शकतो. याला फार काही वेळ लागत नाही. त्यामुळे निसर्गाशी नाते जोडा, तोडू नका. सध्याला मोठी काँक्रीटची जंगले व बेसुमार झाड तोड होत आहे याला यापुढे तरी रोखले पाहिजे. निसर्गाने शेतकऱ्याचे मोठे नुकसान केले आहे. त्या बरोबर राज्यात इतर बाबीचेही नुकसान केले आहे. ते नजरे आड करून चालणार नाही. शाळेत पाणी शिरले आहे. शाळेच्या इमारती पडल्या आहेत. त्याच्या भिंती बांधाव्या लागतील. अनेक शाळांची उभारणी करावी लागेल. सर्वाधिक प्राधान्य आता रस्त्याचे करावे लागणार आहे. हजारो किमींचा नवा रस्ता तयार करावा लागणार आहे. अगोदरच खड्डे असणारा रस्ताच पावसाने गायब झाला आहे. अशा स्थितीत रस्त्यावरून गाड्या चालविणे आवघड आहे. पावसाच्या प्रवाहामुळे नदीचे पात्र रुंदावले आहे. अनेकांच्या बनीम वाहून गेल्या आहे. शेतात होते ते नव्हते अशी स्थिती निर्माण झाली आहे. पंधरा दिवसापेक्षा अधिक काळ झाला असला तरी अजून पंचनामे करण्यात येणार असाच सुर दिसून येत आहे. जे काही शेतकऱ्यास द्यावयाचे आहे ते दिले पाहिजे. सर्वात मोठे संकट तसे पाहिले तर जनावरावर आले आहे. जनावरे जगविणे आवघड आहे. या पावसाने गायी, म्हसी, बैल, शेळ्या आदिचे मोठे नुकसान झाले आहे. दगावली आहेत. जे जिवंत आहेत त्यांना चार कोठून आणावा हा मोठा प्रश्न आहे. जनावरे जगविणे आवघड काम आहे. जनावरांसाठी चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. त्याच प्रमाणे शेतीतील फळभाज्या नष्ट झाल्याने बाजारात पाल्याभाज्या लोप पावल्या आहेत. भाजीपाल बाजारात येत नाहीत. एका पावसाने सर्वच यंत्रणा खोळंबली आहे. जीवनच विस्कळती झाले आहे. शेतकरी संकटात आहेत. त्या बरोबर दररोजचा पाल्याभाज्य व फळेही नष्ट झाली आहे. शाळेच्या इमारती पडल्या आहेत. कच्ची मातीचे घर उद्धस्त झाली आहेत. जनावरे वाहून गेली आहेत. काहींचा मृत्यू झाला आहे. उरलेली आहेत त्यांना कसे जगवावे हा मोठा प्रश्न आहे. जनावरे जगविणे आवघड प्रश्न आहे. त्यांना चारा कोठून उपलब्ध करावा हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे प्रशासनाने कडबा असो किंवा अन्य प्रकारे चारा इतर ठिकाणाहून आणावा लागणार आहे. काही बाबी कठिण आहेत. सर्वच संसार नष्ट झाले असले तरी यावर हिंमतीने मात करावी लागणार आहे. सरकारी अनुदान कधी मिळेल. पंचनामे होणार असल्याने याला विलंब होणार आहे. मदत ही भरघोस असली पाहिजे. तुटपुंजी मदतीने काहीच उपयोग होणार नाही. त्यामुळे भरीव मदतीची गरज आहे. सरकार तर पंचनामे लवकर होणार असे म्हणत आहे यामुळे वेळ लागणार असून पंचनामे योग्य प्रकारे झाले तर ठिक नसता काही ठिकाणी अन्याय होण्याची शक्यता आहे. या पावसाने सर्वप्रकारचे नुकसान झाले आहे. यातून फिनिक्स पक्षाप्रमाणे उभारी घेणे आवघड असले तरी ही एक परिक्षा आहे. यातून मार्ग सर्वांनी मिळून काढला पाहिजे. तरच लवकर परिस्थिती सुधारेल. पावसाने सर्वावर संकट आले आहे त्यामुळे सामुहिक प्रयत्नाची गरज आहे.

# सावरकर घराण्यातील महिलांची महती सांगणाऱ्या त्रिवेणी नाटकास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद







**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा काळ म्हणजे आजच्या पिढीला कल्पनाही करता येणार नाही असा निष्ठा, त्याग,समर्पणाचा कठिण काळ.स्वातंत्र्यलढ्याच्या होमकुंडात अनेक कुटुंबांनी स्वतःला झोकून दिले होते,त्यापैकीच एक सावरकर घराणे. स्वातंत्र्यलढ्यात असीम त्याग आणि अपार धैर्य दाखवत सावरकर घरातील पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांचेही अमूल्य योगदान आहे. या योगदानाची महती सांगणाऱ्या त्रिवेणी या नाटकाच्या नुकत्याच लातुरात पार पडलेल्या प्रयोगास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या नाटकाच्या प्रयोगापूर्वी सौ. संजीवनीताई रमेश कराड,सौ अनुराधाताई बेळंबे,सौ अनुराधाताई कस्तुरे यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

स्वातंत्र्य लढ्यात सुख,समाधानाची आहुती दिलेल्या येसूवहिनी,माई सावरकर आणि ताई सावरकर यांचे धीरोदात्त जीवन या नाटकातून मांडण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगरच्या अनुनाद कलाविष्कार संस्थेच्या त्रिवेणी नाटकाचे लेखन राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या डॉ.प्रीति पोहेकर यांनी केले आहे, तर राजश्री पोहेकर यांनी नाट्य-नृत्य दिग्दर्शन केले आहे.

नाट्य, नृत्य,निवेदनात्मक हे नाटक म्हणजे एक अप्रतिम कलाकृती आहे. सावरकरांनी रचलेल्या काही नृत्यावर खिळवून ठेवणारी अशी नृत्य, अंतर्मुख करणारे प्रसंग आणि विचार करायला लावणारे डॉ प्रिती पोहेकर यांचे निवेदन असा अनोखा मिलाफ या नाटकातून बघायला मिळतो.मध्यांतर नसलेल्या दोन तासांच्या या नाटकाने प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. प्रसंगानुरूप प्रेक्षकांचे डोळे पाणावतात तर सुंदर नृत्य बघताना प्रेक्षक तल्लीन होऊन जातात.लातूरमध्ये झालेला त्रिवेणी नाटकाचा हा दुसरा प्रयोग होता.या दुसऱ्या प्रयोगालाही लातूरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला.त्रिवेणी तील सर्व कलाकार छत्रपती संभाजीनगरचे आहेत. अंगावर शहारा आणणारे असंख्य प्रसंग! कणखर,खंबीरपणे सावरकरांच्या अर्थगर्भ कविता, सावरकर लिखित गीतांवर भावविभोर करणारा पदन्यास,अतिशय स्फूर्तीदायक शिव-आरती,सावरकरांनी वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी लिहिलेल्या फटक्याचे सादरीकरण अगदी उत्साहवर्धक असेच,त्याचबरोबर ने मजसी परत मातृभूमीला गीताचे भावपूर्ण सादरीकरण प्रेक्षकांना तल्लीन करतात.सानिका ओक,पूर्वा लाड,शर्वरी गायकवाड,अंजली कुलकर्णी,ओवी कोल्हटकर,मेघा कुलकर्णी,सार्थक सुरडकर, सिध्दार्थ कौसडीकर, इशान महाजन, कमलेश देशपांडे या कलाकारांनी नृत्य सादर केले.स्वा. सावरकरांची आव्हानात्मक भूमिका अभिनेता तेजस महाजन याने लिलया पेलली आहे.सावरकर म्हणजे शद्बसृष्टीचे धनी,त्यांची भूमिका साकारतांना तेजस महाजन याने संवादफेक,भाषेची पकड हे प्रभावीपणे पेलले आहे. त्याने उभे केलेले सावरकर हे थेट सावरकरांचा भास देत होते. अवघड शब्दांचे सहज उच्चारण, कणखर,खंबीर आवाजात सादर केलेल्या सावरकरांच्या अर्थगर्भ कविता यामुळे त्यांनी उभे केलेले सावरकर मनात घर करून गेले. येसूवहिनीच्या भूमिकेतील राजश्री पोहेकर यांनी नृत्य नाट्य दिग्दर्शनासोबतच येसूवहिनींची भूमिकाही यशस्वीपणे साकारत नाट्कालाएका उंचीवर नेले आहे. येसुवहिनीच्या आयुष्यातील अंगावर शहारा आणणारे असंख्य प्रसंग राजेश्री पोहेकर यांनी साकारले. त्यांनी उभी केलेली येसूवहिनी पाहताना येसुवहिनीचे संपूर्ण जीवन चरित्र डोळ्यांसमोर फिरत राहते, सुख, आनंद, दुःख, विरह, यातना, एकाकीपणा आणि तरीही खंबीरपणा, कणखरपणा अशा विविध छटा राजेश्री यांनी उत्तम उभ्या केल्या.

माई सावरकारांची भूमिका करणार्या अमिता लेकुरवाळे यांनी माईंच्या स्वभावातील संयतपणा योग्य पद्धतीने आत्मसात करत भूमिकेमध्ये उतरवला आहे.ताई सावकरांची भूमिका आरोही लेकुरवाळे हिने साकारली आहे,घारातील लहान आणि करारी स्त्री या ताईंच्या प्रतिमेला आरोहीने अभिनयातून योग्य न्याय दिला आहे.नाटकाची अतिशय महत्वाची लेखन आणि निवेदनाची धुरा डॉ.प्रीति पोहेकर यांनी प्रभावीपणे सांभाळली आहे.त्यांच्या ओघवत्या निवेदनातून विचारले गेलेले प्रश्न विचार करायला भाग पाड्तात.सावरकर हे एक प्रतिभाशाली लेखक,आणी त्यांचे चरित्र उभे करण्याचे अतिशय जबाबदारीचे काम प्रिती पोहेकर यांनी अतिशय संयमितपणे पार पाडले आहे.सावरकर नावच मुळी वादग्रस्त मात्र कुठेही सूर भडकपणा किंवा एकतरफीपणा या संहितेत दिसत नाही,त्यांनी लिहिलेल्या अभ्यासपूर्ण संहितेने नाटकाला एक वैचारिक बैठक असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

एकूणच त्रिवेणी हे सावरकर घराण्यातील महिलांची धगधगती जीवनगाथा मांडणारे नाटक,रंगभूमीवरील एक वेगळ्या धाटणीची कलाकृती आहे.अथर्व मुळे याने केलेले संगीत तर प्रेक्षकांना प्रसंगाच्या अधिक जवळ नेत मनाचा ठाव घेते,वाल्मिक जाधव याची प्रकाश योजना प्रसंगांना उठाव आणते.एकूणच सर्वार्थाने सर्वांगसुंदर असे त्रिवेणी हे नाटक प्रत्येक मराठी माणसाने बघायलाच हवे.''की घेतले न व्रत हे आम्ही अंधतेने'' या सावरकरांच्या ओळींप्रमाणेच डॉ.प्रिती पोहेकर आणि राजश्री पोहेकर या भगिनींनी त्रिवेणी च्या माध्यमातून स्त्रीशक्ति,एकत्र कुटुंबाची ताकद,देशभक्ति याद्वारे आजच्या पिढीला जागृत करण्याचे व्रत हातात घेतले आहे. त्रिवेणीचे २१ प्रयोग या व्रताचे साफल्य दर्शवत आहेत.खरे तर आजच्या अस्थिर समाजाला जागं करण्याची ताकद त्रिवेणी मध्ये आहे.

हा केवळ एका कुटुंबाच्या आयुष्यावर सादर होणारा प्रयोग नसून स्वातंत्र्याच्या होमकुंडात स्त्रियांनी केलेल्या बलिदानाची कथा आणि तरीही त्या उपेक्षित का राहिल्या, ही व्यथा मांडणारा अनोखा प्रयोग आहे. या संस्थेकडून राजयोगीनी अहिल्यादेवी हे नाटकही सादर केले जाते असे संस्थेच्या शिवाली गायकवाड यांनी सांगितले.

# माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचा डॉ.आंबेडकर मेडिकल अल्युमिनी असोसिएशनच्या वतीने सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :**नुकताच लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्राप्त राज्याचे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांचा सत्कार केल्याबद्दल डॉ. आंबेडकर मेडिकल अल्युमिनी असोसिएशन, लातूर यांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. चंद्रकांत शिरोळे हे तर यावेळी लातूर जिल्ह्यातील वैद्यकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणारी नामांकित मंडळी यामध्ये डॉ. हनुमंत किनीकर, डॉ. अजय ओव्हाळ, डॉ. विजय अजनीकर, डॉ. सुनील होळीकर, डॉ. किरण होळीकर, डॉ हरिदास, डॉ सचिन जाथव, डॉ.अभिजित बनसोडे, डॉ.अंबादास कारेपूरकर उपस्थित होते. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना आ. संजय बनसोडे म्हणाले की हा पुरस्कार म्हणजे माझ्या वैयक्तिक यशापेक्षा समाजाच्या सर्व घटकांचे यश आहे. हा पुरस्कार मी लोकांना समर्पित करतो. समाजातील सर्व घटकांनी सुख-दुःखात एकत्र येत रहावे, समाजाच्या मूळ प्रवाहात दुर्बल घटकांना आणण्यासाठी शिकलेली व समृद्ध मंडळी सतत पुढाकार घ्यावा, हेच माझे ध्येय आहे असे सांगून समाजाच्या शिकलेल्या व्यक्तींनी गरीब, वंचित आणि पुढील पिढ्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

डॉक्टर समाजातील एक संवेदनशील घटक असून सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक कार्यातही सहभाग घ्यावा.

दर महिन्याला समाजाच्या बांधणीसाठी असे संमेलन आयोजित करून समाजातील ऐक्य बळकट व्हावे. असे आवाहन केले.

याप्रसंगी डॉ अजय ओव्हाळ, डॉ सुनील होळीकर, डॉ महेंद्र सोनवणे, डॉ हरिदास, डॉ. किणीकर, डॉ देवनीकर, डॉ. बनसोडे यांनी आपले मनोगत मांडले. प्रास्ताविक डॉ. विजय अजनीकर तर आभार डॉ. सचिन जाधव यांनी मानले.यावेळी डॉ. सदानंद कांबळे, डॉ. सी. टी. कांबळे, डॉ. भारती, डॉ. चावडा, डॉ. अभिजित बनसोडे, डॉ. महेंद्र सोनवणे, डॉ. संकेत, डॉ. जगदीश, डॉ. हंसराज कांबळे, डॉ. अतुल लातूरकर, डॉ. आशिष सरवदे, डॉ. रवींद्र भालेराव, डॉ. रवींद्र सोनकांबळे, डॉ. सोमवंशी. उपस्थित होते.

# प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी, रेल्वेचा हा प्लॅट फॉर्म ८० दिवस राहणार बंद

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रवाशांसाठी एक महत्त्वाची बातमी. मुंबईत असलेला छत्रपती महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाट क्रमांक १८ तब्बल ८० दिवस बंद राहणार आहे. पुनर्विकासाच्या कामासाठी फलाट क्रमांक १८ तब्बल ८० दिवस बंद राहणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले.

छत्रपती महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाट क्रमांक १८ हा एक ऑक्टोबर २०२५ पासून ८० दिवस वापरता येणार नाही. फलाट १९ डिसेंबरपर्यंत वापरासाठी उपलब्ध नसेल. यामुळे अमरावती आणि नंदिग्राम एक्स्प्रेस सीएसएमटी ऐवजी दादरपर्यंतच धावणार आहेत. रेल्वे एक ऑक्टोबर ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीत छत्रपती महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाट क्रमांक १८ चा पुनर्विकास करणार आहे. फलाट क्रमांक १८ वर प्रवाशांसाठी अनेक सोयीसुविधांची निर्मिती केली जाणार आहे. या कामासाठी फलाट क्रमांक १८ च्या परिसरात खोदकाम केले जाईल. याच कारणामुळे छत्रपती महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाट क्रमांक १८ रेल्वे वाहतुकीसाठी बंद केला जाणार आहे. दादर ते सीएसएमटीदरम्यान पुढील सूचना मिळेपर्यंत रेल्वेगाड्या रद्द राहणार आहेत. रेल्वे लँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन अर्थात आरएलडीए छत्रपती महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाट क्रमांक १८ चा पुनर्विकास करणार आहे.

सध्या छत्रपती महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाटांवर खांब उभारण्याचे काम सुरू आहे. फलाट क्रमांक १२-१३ वर सुरू असलेले काम लवकरच पूर्ण होईल. यानंतर हा फलाट रेल्वे वाहतुकीसाठी उपलब्ध होणार आहे. त्यानंतर सीएसएमटीतील फलाट क्रमांक १८ वर काम सुरू होणार आहे.

## मराठवाड्यात रात्रभर पावसाचं थैमान!

**मुंबई/प्रतिनिधी :** भोगावती खासापुरी आणि कोळेगाव धरणातून जवळपास ७५ हजार क्युसिक विसर्गने पाणी सीना नदीत येण्यास सुरुवात झाली आहे. माढा परिसरात काल रात्रीपासून जोरदार पाऊस सुरू आहे. परंडा अहिल्यानगर भागात पाऊस झाल्यास पुन्हा एकदा महापुराचा धोका वाढणार आहे. पाऊस उघडेपर्यंत पूरग्रस्त बाधित लोकांना विस्थापित कॅम्प मध्ये थांबण्याचे आवाहन आमदार अभिजीत पाटील यांनी केले आहे. माढ्यात आत्तापर्यंत ७४ हजार हेक्टर वरील पिके पाण्याखाली गेली आहेत. ७५० घरांची पडझड झाली असून दीडशे जनावरांचा मृत्यू झालाय. ३६०० कुटुंबांना पुराचा फटका बसला आहे. १३००० पूरग्रस्तांना विस्थापित कॅम्प मध्ये ठेवण्यात आला आहे. तर ९२०० जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आला आहे.

रस्ते-महामार्ग बंद, नद्यांना पूर

लातूर जिल्ह्यात सर्वदूर मुसळधार पाऊस झाला असून मांजरा,

# प्रसादासाठी खास कॅरेमल शिरा

आज शैलपुत्री देवीच्या नैवेद्यासाठी तिच्या आवडीचा साजूक तुपातील वेगळ्या पद्धतीने बनवलेला खास शिरा बनवून नैवेद्य दाखवू आणि हा प्रसाद सर्वजण आनंदाने सेवन

करतील.

साहित्य :

१ वाटी रवा , २ वाट्या दूध , ८..१० वेलदोडे सोलून जाडसर केलेली पूड , पाऊण वाटी साखर , चिमुटभर मिठ , थोड्या केशरकाड्या , सजावटी साठी ड्रायफ्रुट्सचे काप .

कृती :

एका कढईत साखर घालून मध्यम आचेवर ठेवावी. ३..४ मिनिटात साखर पूर्ण विरघळून त्याचा पाक होतो . तो पक्का होऊ द्यावा व तो कडक बनायला सुरु झाला की त्यात दूध घालून व्यवस्थित ढवळावे . पाक कडक असल्यामुळे सुरुवातीस हा दुधात विरघळेल की नाही असे वाटते, पण थोड्याच वेळात तो विरघळायला सुरु होईल. दूध मात्र सतत ढवळत रहावे . पाक पूर्ण विरघळला की त्यात थोड्या केशर काड्या घालाव्यात. म्हणजे दुधाला सुरेख रंग आणि सुगंधही येतो.आता गॅस बंद करावा.

दुसऱ्या कढईत सुरुवातीस २ चमचे तूप घालून त्यात रवा घालावा व मंद आचेवर परतत रहावा

१ चमचा तूप बाजूला ठेवून थोडे थोडे तूप घालत रवा मस्त सोनेरी रंगावर खमंग वास येईपर्यंत परतावा.

रवा छान परतून झाल्यावर त्यात साखर ,केशर मिश्रित दूध घालावे .मग वेलदोड्याची पूड ,मिठ घालून व्यवस्थित परतून एकजीव करावे . नंतर त्यावर बाजूला ठेवलेले साजूक तूप घालून झाकण ठेवून मस्त वाफ काढावी. हा शिरा मंद आचेवरच करावा . त्यामुळे साजूक तुपावर खमंग भाजलेला रवा , कॅरेमलचे दूध , जाडसर कुटलेले वेलदोडे , केशर या सर्वांचा स्वाद शिऱ्यात मस्त मुरतो आणि मग त्याची टेस्ट खूपच भन्नाट येते .

आता आपला शिरा तयार झाला आहे. तो सर्व्हिंग डिशमध्ये काढून तो ड्रायफ्रुट्स,केशर यांनी सजवावा.

वैशिष्टय: देवाला नैवेद्य करण्यासाठी बरेचदा आपण झटपट होतोम्हणून शिरा बनवतो .सत्यनारायण पुजेला तर शिराच लागतो . खूप जणांना मधल्यावेळेस खाण्यासाठी ,किंवा खास करून पाऊस पडत असला की शिरा आणि कांदा भजी ,लिम्बाचे लोणचे असा मेनू मनापासून आवडतो .उन्हाळ्यात तर गोड पदार्थ खावेच ,म्हणजे पित्ताचा त्रास होत नाही . आणि तहान पण सारखी लागत नाही . थंडीत तर गरम गरम शिरा , बटाटेवडा किंवा कांदा भजी म्हणजे स्वर्गातील जणू अमृतच! शिरा नेहमी एकाच पद्धतीने बनवून आणि खाऊन कंटाळा येतो . आता पायनपलं , मँगो यासारखी वेगवेगळी फळे घालून पण बनवतात ,मुगाचाही बनवतात , पण प्रत्येक वेळी फळे घरात

असतीलच असे नाही .

जेवणात सुद्धा स्वीट डिश म्हणून शिरा बनवला जातोच , पण लग्नात आदल्या दिवशी रात्रीचा मुख्य मेनू खास करून कढी ,खिचडी ,शिरा हाच बहुतेक ठिकाणी असतो . म्हणून आज आपण तेच साहित्य वापरून पण पद्धत बदलून बनवूया . मग पहा , चव कित्ती वेगळी आणि सुंदर लागते ते !

हा वेगळ्या पद्धतीने बनवलेला शिरा करतानांच इतका दुरवर सुगंध दरवळतो की कोणालाही खाण्याचा मोह आवरणे अशक्यच होते . दुधामुळे सॉफ्ट होऊन टेस्ट पण सुरेख येते ,पण निम्मे पाणी आणी निम्मे दूध वापरले तरीही चालते . जाड रवा थोडा जास्त फुगतो त्यामुळे त्याला पाव ते अर्धा कप दूध थोडेसे जास्त लागते .मोकळा शिरा हवा असेल तर जाडसर

रवा वापरावा व मऊ,ओलसर शिरा बनवण्या- साठी बारीक रवा लागतो. केशराचा रंग छानच येतो पण जास्त केशरी आवडत असेल तर किंचित फूड कलर घातला तरी चालेल.कॅरेमल मुळे रंग आणि चव दोन्ही जबरदस्त येते. हा पौष्टीक शिरा सर्वांना विशेष आवडेल.

**सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे .**

# आपल्या मनाचा मोठेपणा

कथा : रमेश तांबे

शाळेत भाषण स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्याधरने नेहमीप्रमाणे आपले नाव स्पर्धेसाठी दिले होते. गेली चार वर्षे विद्याधरच प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावत होता. यावर्षी 'छत्रपती शिवरायांचे स्वराज्य' या विषयावर स्पर्धकांना तीन मिनिटे बोलायचे होते.

विद्याधरने नेहमीप्रमाणे स्पर्धेची तयारी सुरू केली. विद्याधर वर्गातला हुशार आणि विनयशील विद्यार्थी. सर्वांशी प्रेमाने, नम्रतेने बोलणारा, सर्वांना मदत करणारा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमात नियमितपणे भाग घेणारा! हे त्याचं स्पर्धेत भाग घेण्याचं पाचवं आणि शेवटचं वर्ष. यावर्षी प्रथम क्रमांकाचं पहिलं बक्षीस पटकावून तो दहा हजार रुपयांची घसघशीत कमाई करणार होता. यावर्षी दहावीची परीक्षा देऊन तो शाळेचा निरोप घेणार होता. शिवाय जाता जाता सलग पाच वेळा वक्तृत्व स्पर्धेचं बक्षीस पटकावून! स्पर्धेला केवळ चारच दिवस उरले होते. विद्याधरची पूर्ण तयारी झाली होती. विद्याधरच्याच मागे बसणारा अजिंक्य नावाचा त्याचा मित्र; तोही या स्पर्धेत नेहमी भाग घ्यायचा. पण विद्याधर पहिला आणि अजिंक्य नेहमीच दुसरा! त्यामुळे अजिंक्यच्या मनात विद्याधरबद्दल असूया होती. प्रत्येक वेळी आपला दुसरा क्रमांक! असे का होते? विद्याधर चांगल्या घरातला, त्याचे आई-बाबा उच्चशिक्षित, श्रीमंत म्हणूनच त्याचा पहिला क्रमांक येतो. असा विचार अजिंक्य सतत करायचा. त्याच्या मित्रांशी बोलताना विद्याधरबद्दल नको नको ते बोलायचा. विद्याधरला हे सर्व कळत होतं. शाळा सोडताना अजिंक्य सारखा आपला एक मित्र आपल्याबद्दल वाईट का बरे बोलतो? गेली दहा वर्षे आपल्या सोबत असणारा आपला हा मित्र असे का बरं वागतो? याचं कोडं त्याला उलगडत नव्हतं. आपण भाषण स्पर्धा जिंकण्यापेक्षा आपल्या मित्राचं मन जिंकलं पाहिजे असा विचार विद्याधरच्या मनामध्ये येऊ लागला. त्याचं मन आपण कसे जिंकू याचा विचार करता करता स्पर्धेचा दिवस उजाडला.

शाळेचे सभागृह गच्च भरले होते. व्यासपीठावर एक माईक उभा करून ठेवला होता. परीक्षक पहिल्या रांगेत बसून परीक्षण करणार होते. विद्यार्थी, शिक्षक यांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सगळ्यांच्याच मनात उत्सुकता होती, कोण जिंकणार? एक, दोन, तीन, चार अशा क्रमांकाचे वक्ते येऊन गेले. सगळ्यांची भाषणे छान होत होती. तेवढ्यात अजिंक्य राणेचं नाव पुकारलं गेलं. टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. कारण अजिंक्यसुद्धा एक उत्तम वक्ता होता. तोही गेली चार वर्षे दुसऱ्या क्रमांकाचं बक्षीस मिळवतच होता. मोठ्या आवेशात, खणखणीत आवाजात, स्पष्ट शब्द उच्चारात, योग्य हातवारे आणि छान हावभावाचे प्रदर्शन घडवत अजिंक्यने सगळे सभागृह जिंकून घेतले. यावर्षी पहिलं बक्षीस अजिंक्यच मिळवणार याची खात्री सर्वांना पटली.

आता विद्याधर कुलकर्णीच्या नावाचा पुकारा झाला. एकदा, दोनदा, नव्हे तीनदा झाला. पण विद्याधर व्यासपीठावर आलाच नाही. सगळी मुलं, शिक्षकवृंद विद्याधरला शोधू लागले. पण विद्याधर तर कुठेच दिसेना. काय झाले? कुठे गेला? मुलांची कुजबूज सुरू झाली. पण दोन मिनिटांनंतर पुढचे नाव पुकारले गेले अन् स्पर्धा सुरू झाली. अजिंक्य मनातून खूप खूश झाला. आता पहिला क्रमांक आपलाच येणार याची त्याला खात्री पटली. पण विद्याधर स्पर्धा सोडून कुठे गेला? हा प्रश्न मात्र अजिंक्यला छळू लागला. यथावकाश स्पर्धा संपली. दहा हजार रुपयांचं पहिलं बक्षीस अजिंक्यलाच मिळालं. मोठ्या अभिमानानं त्यानं ते स्वीकारलं.

शाळा सुटण्याची बेल वाजली. अजिंक्य शाळेबाहेर पडला. तोच समोर विद्याधर उभा! अजिंक्यने मोठ्या उत्साहाने त्याला मिळालेलं पहिल्या क्रमांकाचं बक्षीस दाखवलं. विद्याधरने त्याला मिठी मारून त्याचं अभिनंदन केलं. मग अजिंक्यने त्याला विचारलं, अरे नेमका स्पर्धेच्याच वेळी तू कुठे गेला होतास? किती वेळा तुझे नाव पुकारले! विद्याधरला बघताच तिथे मुलांचा घोळका जमला. विद्याधर सांगू लागला, अरे अजिंक्य, स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तुझा लहान भाऊ शाळेत आला होता. आईला बरं वाटत नाही असं तो रडत रडत सांगत होता. मग मीच त्याच्या सोबत गेलो आणि आईला जवळच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करून आलो. आता ती बरी आहे. हे ऐकताच अजिंक्य ओरडला, काय? माझ्या आईसाठी तू स्पर्धा सोडलीस! अजिंक्यचे डोळे भरून आले. त्याने विद्याधरला मिठी मारली आणि रडत रडत म्हणाला, विद्याधर किती मोठ्या मनाचा आहेस रे तू! मला पहिलं बक्षीस मिळावं म्हणून तू मला न सांगता स्वतः गेलास. हे खरं आहे ना? अजिंक्य भरल्या डोळ्यांनी विद्याधरकडे बघत होता अन् त्याच्या मनाचा मोठेपणा अनुभवत होता. दुसरीकडे विद्याधरला मात्र मित्राच्या रूपानं एक अमूल्य बक्षीस मिळालं होतं.

# आहार आणि पोषण



संतुलित आहार घ्या: भाज्या, फळे, संपूर्ण धान्य आणि वनस्पती-आधारित प्रथिने (मसूर, बीन्स, नट) यांचा आहारात समावेश करा.

प्रक्रिया केलेले मांस टाळा: बेकनसारखे प्रक्रिया केलेले मांस खाणे टाळा. भरपूर पाणी प्या: साखरयुक्त पेये आणि ज्यूसचे सेवन मर्यादित करा. हॉटेलमध्ये खाणे टाळा: शक्यतो टाळा आणि पचायला हलके, ताजे अन्न खा. शारीरिक आरोग्य-नियमित व्यायाम करा: शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणे महत्त्वाचे आहे. पुरेशी झोप घ्या: शरीराला विश्रांतीसाठी पुरेशी झोप मिळणे आवश्यक आहे. स्वच्छता पाळा: जंतूंना दूर ठेवण्यासाठी आणि आजार टाळण्यासाठी नियमित साफसफाईचे वेळापत्रक ठेवा.

मानसिक आणि सामाजिक आरोग्य

मानसिक आरोग्याला प्राधान्य द्या: तणाव कमी करा आणि मानसिक आरोग्याची काळजी घ्या.

सामाजिक संबंध जपा: इतरांशी असलेले संबंध आरोग्यावर परिणाम करतात. इतर सवयी, नियमित आरोग्य तपासणी करा: नियमित आरोग्य तपासणी करून आरोग्य चांगले ठेवा. विविधता आणा: दररोज वेगवेगळ्या भाज्या खाण्यासारख्या गोष्टींमुळे आहारात विविधता येते.

# मानसिक आजार आणि शारीरिक वाढ याचा संबंध कसा आहे ?

पूर्वी वाढत्या वयात या आजाराचं प्रमाण दिसून येत असे. मात्र



आज असं नाही म्हणता येणार कारण आज लहान वयातच अनेकांना तणाव दिसून येत असल्यानं मानसिक आजाराचं प्रमाण वाढत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचं प्रमाण सर्वांत जास्त आहे. विशेष म्हणजे केवळ ८ ते १० वर्षांच्या मुला-मुलींमध्ये देखील या आजाराचे प्रमाण वाढत असल्याचं दिसून येत आहे आणि ही बाब खूप गंभीर आहे. उदाहरण द्यायचं झालं तर माझ्याकडे एका १० वर्ष मुलीचे पालक माझ्याकडे आले आणि ते म्हणाले की माझ्या मुलीला अध्यात्माची फार ओढ लागलेली आहे आणि ती नेहमी म्हणत आहे की मला देवाकडे जायचे आहे विशेष म्हणजे ते पालक खूप खुश होते की त्यांच्या मुलीला देवाकडे जायचे आहे.पण त्यांना हे माहितीच नव्हतं की त्यांच्या मुलीला एक मानसिक आजार आहे आणि हे आत्महत्येकडे जाण्याचं लक्षण असू शकतं. गंभीर बाब म्हणजे ते पालक मानसिक आजाराविषयी ते अनभिज्ञ होते. या वयोगटातल्या मुला-मुलींमधील वागण्याच्या बदलत जाणाऱ्या सवयीवरून आपणाला याचा अंदाज येणं आवश्यक आहे. त्यांचं शांत शांत राहणं, चिडचिड करणं, बोलण्याच्या पद्धतीत बदल होणं अशा काही गोष्टींवरून आपणास लक्षात यायला हवं की ते मानसिक तणावाखाली आहेत.

# आता अस्वस्थ लडाख



राज्याचा दर्जा, अनुसूचीत समावेश आणि बेरोजगारीच्या प्रश्नांची तड लागावी, ही तरुणांची मागणी अनाठायी म्हणता येणार नाही. त्यांच्या काही मागण्या मान्यही झाल्या आहेत; पण काही मागण्या अद्याप अनिर्णित आहेत.

पूर्ण राज्याच्या मागणीसाठी लेह-लडाखमध्ये सुरू असलेल्या शांततामय आंदोलनाला परवा गालबोट लागले. अस्वस्थ तरुणाईने जाळपोळ केली. हिंसाचारात भाजपच्या कार्यालयाची होळी झाली. आंदोलन आणि पोलिसांमध्ये झालेल्या संघर्षात चार जणांचे बळी गेले. या केंद्रशासित प्रदेशात संचारबंदी लागू करण्यात आली. आता या आंदोलनाचे खापर शिक्षण तज्ज्ञ आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक आणि काँग्रेसवर फोडण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. वांगचुक यांना यासंदर्भात अटकही झाली आहे. खरे तर युवकांकडून हिंसाचार सुरू होताच याच मागणीसाठी गेल्या दहा सप्टेंबरपासून सुरू असलेले उपोषण थांबवत वांगचुक यांनी तरुणांना शांततेचे आवाहन केले होते. हिंसाचारामुळे आपल्या उद्दिष्टांना धक्का बसत असून, लडाखमध्ये अस्थिरता निर्माण होऊ नये अशी आपली इच्छा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सोनम वांगचुक यांची विधाने प्रक्षोभक होती आणि त्यामुळेच तेथील तरुणांना हिंसाचारास प्रवृत्त केले गेले असा आरोप त्यांच्यावर केंद्रीय गृहमंत्रालयाकडून ठेवला गेला. त्यांनी स्थापन केलेल्या दोन संस्थांविरुद्ध सीबीआय कारवाईचा बडगा उगारण्यात आला आणि या दोन्ही संस्थांचा परदेशात देणगी मिळवण्याचा परवाना रद्द करण्यात आला. परदेशातून देशविघातक कृत्यासाठी या संस्थांना निधी मिळाल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. लडाखला स्वतंत्र राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन भाजपने २०२० मध्ये झालेल्या लडाख ऑटोनॉमस हिल कौन्सिलच्या, (तेथील स्थानिक स्वराज्य संस्था) निवडणुकीत दिले होते. ते पूर्ण करण्याच्या मागणीसाठी गेल्या पाच वर्षांत शांततामय मार्गाने आंदोलने सुरू होती. आता पुन्हा तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक तोंडावर आली असताही पूर्ण राज्याची मागणी पूर्ण न झाल्याने तरुणांमधील अस्वस्थतेने आंदोलनाला हिंसाचाराचे गालबोट लागले. लेह-लडाखला राज्याचा दर्जा आणि सहाव्या अनुसूचीतमध्ये समावेश ही आंदोलकांची मागणी आहे. वांगचुक यांनी सुरू केलेल्या उपोषणामुळे यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाची व्याप्ती वाढली आणि आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. प्रामुख्याने या मागणीमागे स्थानिक लोकांना स्वायत्तता, जमिनीचे हक्क, सामाजिक व आरक्षणविषयक लाभ मिळावेत हा उद्देश आहे.


बळीचा बकरा

आता या आंदोलनास केंद्र सरकारने वांगचुक यांना जबाबदार धरले आहे. आंदोलनाच्या दिवशी वांगचुक यांच्यावर गृहमंत्रालयाने केलेले आरोप आणि त्याच्या दुसर्याच दिवशी त्यांच्या दोन संस्थांच्या विरोधात सुरू झालेल्या सीबीआय चौकशी हा निश्चितच योगायोग नाही. वांगचुक यांनी संस्थेतील अनियमिततेचा आणि परदेशी मदतीचा आरोप फेटाळला आहे. आम्हाला विदेशी मदतीवर अवलंबून राहायचे नाही, आम्ही आमचे ज्ञान निर्यात करतो आणि त्यातून महसूल मिळवतो असे त्यांनी म्हटले आहे. एफसीआरए (परकीय चलन नियंत्रण कायदा) सर्व संस्थांना लागू आहे आणि परकीय निधीचा वापर आणि हिशेब तपासणीचा सीबीआयचा अधिकार ही सामान्य प्रशासकीय बाब आहे.

हे मान्य केले तरी आंदोलनापाठोपाठ ही कारवाई सरकारच्या हेतूवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरते. यातून सामाजिक अस्वस्थेतला अधिकच बळ मिळेल. आंदोलनासाठी वांगचुक यांना जबाबदार ठरवणे हा त्यांना बळीचा बकरा बनवण्याचा केंद्राचा डाव म्हणावा लागेल. स्वतः वांगचुक यांनी आपल्याला तुरुंगात टाकण्याची तयारी सरकारने चालवली असून, त्यासही आपण तयार असल्याचे म्हटले आहे. तरुणांची अस्वस्थता सरकारने समजून घेतली पाहिजे. लेह-लडाखचा प्रदेश चीनलगत असल्याने या प्रदेशाला कितपत स्वायत्तता द्यायची, हा केंद्र सरकारपुढील खरा प्रश्न आहे. प्रश्न गुंतागुंतीचा असला तरी सरकारला चर्चा आणि संवादातून मार्ग काढावा लागेल. आश्वासन देऊनही प्रश्न सुटला नसल्याने फसवणूक झाल्याची तरुणांची भावना आहे. यातूनच वांगचुक यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. सरकार वांगचुक यांना आंदोलनासाठी जबाबदार ठरवू शकेल; मात्र तरुणांच्या अस्वस्थतेला संवादानेच मार्ग काढावा लागेल, ही जबाबदारी सरकारला टाळता येणार नाही.

## डॉक्टर टीप्स

**शिंकताना किंवा खोकताना लघवी होत असेल तर असू शकतो हा आजार...**



### हेल्थ टिप्स

परिस्थितीत शिंक किंवा खोकला आल्यावर लघवी होऊन जाते.

कारणे-

स्नायूंचा कमकुवतपणा

महिलांमध्ये सरत्या वयानुसार हा आजार होऊ शकतो. साधारणपणे वयाच्या ३० ते ३५ वर्षानंतर हा त्रास उद्भवतो.

काही महिलांमध्ये वृद्धत्वानुसार हा आजार संभवतो.

बाळास जन्म दिल्यावर अनेक स्त्रियांच्या खालील शरीराच्या स्नायू कमकुवत होतात. कारण बाळाच्या जन्माच्या वेळीस हे स्नायू जास्त ताणले जातात.

जेव्हा आई कमजोर आणि मूळ सशक्त असल्यास असे होणे अधिक संभवते.

या शिवाय स्थूलपणा, मधुमेह असल्यास हा त्रास संभवतो.




## विनोद

**मुलगा : आई, नव्या ट्युबमधील टूथपेस्ट किती लांब होते माहीत आहे.**

**आई : नाही, तू सांग.**

**मुलगा : गॅलरीत पिळायला सुरुवात केली तर बाथरूमपर्यंत येते. एवढीच लांब आहे.**

## संदेश

Santa: tumhaari wife kyu hamesha gussa rahti hai?

Banta: maine galti se use bola tha ki "tum gusse main bhi bahut khoob lagti ho"

## सुविचार

गुलाब देणाऱ्या हातांना त्याचा सुगंध चिकटल्याशिवाय राहात नाही.

**– बाबा आमटे**




**संस्कृत सुभाषित**

**अनिर्वेदः श्रियो मूलं लाभस्य च शुभस्य च॥ (उद्योगपर्व, अध्याय ३९, श्लोक ५९, महाभारत)**

**अर्थ –** लक्ष्मीचे, लाभाचे आणि कल्याणाचे मूळ सतत उद्योग करणे हे आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. २९



## आडवे शब्द

१. गणपतीच्या रूपाचे आरतीमधील वर्णन
७. छोटी लढाई
१०. समूह, जथा
११. नड
१२. त्रासदायक
१४. चिखलाची जमीन
१६. डोळ्यात पाणी आणणारा कंद
१७. बेचव
१९. हिंदीत वागण्यचे वळण
२०. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
२१. पोरका
२२. बाळभाषेत ईश्वर
२३. आईवडिलांचे छत्र असलेला
२४. कमळ
२५. युवक
२७. किंमत
२८. हुक्की, लहर
२९. कहाणी
३०. दुर्दशा
३२. उत्कर्षाचा काळ
३५. सांघिक व्यायाम
३७. मान देण्यास योग्य असा
३९. सापाची एक जात
४०. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
४२. आठवण
४३. रामाला बोरे देणारी
४४. सारखा
४६. आई
४८. रामचरित मानस लिहिणारे हिंदी संत
५०. साग्रसंगीत भोजनाची खाशी पंगत
५३. किंमत
५५. मूल
५७. उणीव भरून काढणारी
५८. छोटासा
६१. पिकाचा पावसाळी हंगाम
६२. सुगंध
६३. रियाझ
६४. हाताचा उपडा पंजा
६५. सरोवर
६६. ठाणवई
६७. प्रजा
६८. 'माई' जोडल्यास विठ्ठलपत्नीचे नाव
७०. कोणत्याही क्षेत्रातील प्रतिभावंत
७२. मांडणी करणे, एकावर एक ठेवणे
७४. वर्दळ
७५. पांढरशुभ्र (हिंदी)
७८. खांद्यावरून घ्यायचे वस्त्र
७९. कठीण प्रसंग
८०. होडके, नावाडी

## उभे शब्द

२. डोंगर खोदून केलेला रस्ता
३. प्रत्येक
४. चंद्र
५. किंचित तांबड्या रंगाचे
६. गोष्ट फुगवून सांगणे (वाक्प्रचार)
७. स्वच्छ, चमकणारे
८. मोगऱ्याची मोठ्या पाकळ्यांची जात
९. झोक, वळण
१०. एकमेकांवर काम ढकलणे, चुकवाचुकव
१३. अस्थिर संपत्ती
१५. पाकळी, तुकडी
१६. बायको
१८. पौराणिक अश्ववाहन
२१. अगम्य
२३. उत्सव
२४. कारण
२६. तात्पुरते रुसणे
२७. भारताचा राष्ट्रीय पक्षी
२८. मानसिक धक्का (हिंदी)
३०. पाडाव, पडणे
३१. खराब, वाईट
३३. घोडा
३४. मुद्यावरून गुद्यावर येणे
३६. संगीतातील एक राग
३८. अनावश्यक
४१. अत्तरासाठी प्रसिद्ध उत्तर प्रदेशातील शहर
४४. नेहमी
४५. नमुनेदार
४६. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा
४७. अपघात, दुर्दैवी प्रसंग (हिंदी)
४९. लवकुशाची आई
५०. पुराणकालीन पर्वत, दंड लावल्यास पाठीचा कणा
५१. चंचल, बेशिस्त
५२. शांतता
५४. प्रमाणपत्र, उदाहरण
५६. सत्व
५९. चर, खंदक
६०. नवारीने बाज विणणे
६२. फुल, पुष्प
६३. एकरूपता
६५. बोबडी वळणे
६९. उंचीने कमी
७१. तमाशातील ठसकेबाज नृत्यगीत
७३. ओरखडा
७४अ. कर्ता विचारणारा प्रश्न
७६. रिंगण
७७. औषध

## आडवे उत्तर

१.लंबोदर पितांबर ७.चकमक १०.टोळी ११.गरज १२.जाचक १४.दलदल १६.कांदा १७.नीरस १९.चालचलन २०.लवाद २१.अनाथ २२.बाप्पा २३.सनाथ २४.सरोज २५.तरूण २७.मोल २८.सणक २९.कथा ३०.परवड ३२.लहरबहर ३५.कवायत ३७.माननीय ३९.मणेर ४०.मनकवडा ४२.सय ४३.शबरी ४४.समान ४६.माता ४८.तुलसीदास ५०.मेजवानी ५३.दरदाम ५५.लेकरू ५७.भर ५८.लहानसा ६१.खरीप ६२.सुवास ६३.सराव ६४.तळवा ६५.तलाव ६६.समई ६७.रयत ६८.रखु ७०.कलाकार ७२.रचणे ७४.ये-जा ७५.सफेद ७८.उपरणे ७९.आणीबाणी ८०.तारवा

## उभे उत्तर

२.बोगदा ३.दर ४.रजनीनाथ ५.तांबूस ६.रजाचा गज करणे ७.चकचकीत ८.मदनबाण ९.कल १०.टोलवाटोलव १३.चल १५.दल १६.कांता १८.रथ २१.अनाकलनीय २३.सण २४.सबब २६.रुसवा २७.मोर २८.सदमा ३०.पतन ३१.डबडा ३३.हय ३४.हमरीतुमरीवर येणे ३६.यमन ३८.नसता ४१.कन्नोज ४४.सदा ४५.मासलेवाईक ४६.मामलतदार ४७.हादसा ४९.सीता ५०.मेरू ५१.वाभरा ५२.नीरवता ५४.दाखला ५६.कस ५९.हाळ ६०.नवारणे ६२.सुम ६३.समरसता ६५.ततपप ६९.खुजा ७१.लावणी ७३.चरा ७४अ.कोणी ७६.फेर ७७.दवा



# क्रीडा विश्व





# भारताने मिळवला दणदणीत विजय

**६९** नाबाद धावा केल्या तिलक वर्माने

**१४७** धावांचे दिले होते पाकने टार्गेट

**९** वा एशिया कप भारताने मिळवला

दुबई: : भारत आणि पाकिस्तान यांच्यात आशिया चषकातील अंतिम सामना फारच अटीतटीचा झाला. पण भारताने तिलक वर्माच्या बळावर दणदणीत विजय मिळवला.
भारतीय संघाने अंतिम सामन्यात पाकिस्तानवर ५ विकेट्सने दणदणीत विजय मिळवत आशिया चषक आपल्या नावे केला आहे. तिलक वर्मा भारताच्या विजयाचा हिरो ठरला. रिंकू सिंहने अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत भारताचा विजय पक्का केला. विजयासह सर्वात मोठी गोष्ट म्हणजे सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने आशिया चषक

## तिलक वर्मा विजयाचा हिरो

स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा जिंकली आहे.
भारताला अखेरच्या षटकात ६ चेंडूत १० धावांची गरज होती. १९व्या षटकात फहीम अश्रफने अखेरच्या चेंडूवर शिवम दुबेला झेलबाद केलं. यानंतर अखेरच्या षटकासाठी रिंकू सिंग फलंदाजीला आला. पहिल्या चेंडूवर तिलक-रिंकूने २ धावा केल्या. तिलकने दुसऱ्या चेंडूवर षटकार लगावला आणि इथेच भारताचा विजय पक्का झाला. त्यानंतर संपूर्ण स्पर्धा न खेळलेल्या रिंकू सिंहने फक्त १ चेंडू खेळत विजयी चौकार लगावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने आशिया चषकात पाकिस्तानचा ३ वेळा पराभव करत हॅटट्रिक नोंदवली आहे.

एकही सामना न गमावत टीम इंडिया ठरली आशिया चषक चॅम्पियन
पाकिस्तानने दिलेल्या १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरूवात प्रचंड वाईट झाली. भारताने पॉवरप्लेमध्ये ३ मोठ्या विकेट्स गमावल्या. अभिषेक ५ धावा करत, गिल १२ धावा तर सूर्यकुमार यादव १ धावा करत बाद झाले. यानंतर तिलक वर्माने संजू सॅमसनच्या साथीने भारताचा डाव सावरला. तिलक वर्माने अर्धशतक करत मैदानावर पाय घट्ट रोवून उभा राहिला. संजू २४ धावा करत बाद झाला. तिलकने यानंतर शिवम दुबेसह अर्धशतकी भागीदारी केली. तर शिवम दुबेने तिलक वर्माला चांगली साथ दिली आहे. तिलक-शिवमने ६० धावांची भागीदारी रचली, जी महत्त्वपूर्ण ठरली. शिवम दुबे कमालीचे मोठमोठे फठके खेळले. तिलक वर्मा भारतासाठी या सामन्यात तारणहार ठरला.
पाकिस्तानकडून फहीम अश्रफने उत्कृष्ट गोलंदाजी करत तीन विकेट्स घेतले. तर अबरार अहमद आणि शाहीन आफ्रिदीने १-१ विकेट घेतली. भारताने नाणेफेक जिंकत पाकिस्तानला फलंदाजीसाठी पाचारण केलं. पाकिस्तानची सुरूवात चांगली झाली आणि संघाच्या सलामीवीरांनी ८४ धावांची भागीदारी रचत एकही विकेट गमावली नाही. पॉवरप्लेमध्ये पाकिस्तानने ५६ धावा केल्या. यासह फरहानने पुन्हा भारताविरूद्ध अर्धशतक झळकावलं. तर फखर जमाननेही ४६ धावांची खेळी केली. पण वरूण चक्रवर्तीने भारताला ब्रेकथ्रू मिळवून दिला आणि टीम इंडियाचं सामन्यात पुनरागमन झालं.

## पाकिस्तानने मैदानात केला नको तो प्रकार



दुबई-भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या आशिया कप फायनलच्या टॉसवेळीही हाय व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान आघा या दोघांसोबत दोन ब्रॉडकास्टर टॉससाठी मैदानात आले. टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी सूर्यकुमार यादवची मुलाखत घेतली. तर पाकिस्तानचा माजी फास्ट बॉलर वकार युनूसने सलमान आघाला प्रश्न विचारले. आशिया कपमध्ये पहिल्यांदाच दोन ब्रॉडकास्टर टॉसवेळी मैदानात उपस्थित होते.
याआधी भारत-पाकिस्तान यांच्यातल्या ग्रुप स्टेज आणि सुपर-४ सामन्यावेळी एकाच ब्रॉडकास्टरने दोन्ही कर्णधारांना प्रश्न विचारले होते, पण मागच्या दोन सामन्यांनंतर भारत-पाकिस्तानच्या टीममधला तणाव वाढला होता. आशिया कपच्या फायनलआधी पीसीबी आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे प्रमुख मोहसिन नक्वी यांनी उचकवणारी वक्तव्य केली होती. मभारताविरुद्ध तुम्हाला जे करायचं आहे ते करा, मी सांभाळून घेईनफ, असं नक्वी म्हणाले. यानंतर आशिया कपच्या फायनलमध्ये टॉसवेळी वाद निर्माण झाला. रवी शास्त्रींना उत्तर द्यायचं नाही म्हणून पाकिस्तानने वकार युनूसला प्रश्न विचारण्यासाठी बोलावलं.आशिया कपमध्ये भारत-पाकिस्तान यांच्यातल्या पहिल्या सामन्यापासून वाद पाहायला मिळाले. १४ सप्टेंबरला झालेल्या सामन्यात भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंसोबत हस्तांदोलन केलं नाही. याचा निषेध म्हणून पाकिस्तानचा कर्णधार सलमान आघा मॅच संपल्यानंतरच्या सोहळ्याला आणि पत्रकार परिषदेला उपस्थित राहिला नाही. तसंच सुपर-४ मधल्या सामन्यानंतर सलमान आघाने भारतीय पत्रकारांना प्रश्न विचारायला मनाई केली. तर पीसीबीचे प्रमुख मोहसिन नक्वी यांनीही टाळाटाळ करणारी उत्तरं दिली.दुसरीकडे भारतीय खेळाडूंनी मात्र कठीण प्रश्नांनाही उघडपणे तोंड दिलं. हस्तांदोलन वादावेळी सूर्यकुमार यादवने आत्मविश्वासाने उत्तर देऊन मनं जिंकली, पण फायनलमध्ये पाकिस्तानने दोन ब्रॉडकास्टर मैदानात उतरवून पुन्हा एकदा रडारड

## अध्यक्षांची निवड होताच बिसीसीआय चा गेमचेंजर मूव्ह!

### अजित आगरकर यांच्या निवड समितीत मोठी उलथापालथ



मुंबई-बीसीसीआयला अलीकडेच नवीन अध्यक्ष मिळाले असून ही जबाबदारी माजी क्रिकेटपटू मिथुन मन्हास यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. याचबरोबर भारतीय संघाच्या निवड समितीतही मोठा बदल करण्यात आला आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू प्रज्ञान ओझा आणि आरपी सिंग आता पुरुष वरिष्ठ संघ निवड समितीचे सदस्य झाले आहेत.
तर महिला क्रिकेट निवड समितीच्या अध्यक्षा म्हणून दिल्लीच्या अमिता शर्मा यांची नियुक्ती झाली आहे. अशा प्रकारे निवड समितीचे चेअरमन अजित आगरकर यांना दोन नवे सहकारी मिळाले असून हे सर्व मिळून टीम इंडियाची निवड करतील.
काही दिवसांपूर्वी बीसीसीआयने पुरुष वरिष्ठ संघासाठी दोन नवीन निवडकर्त्यांची घोषणा केली होती. त्यानुसार प्रज्ञान ओझा आणि आरपी सिंग या दोन दिग्गजांना जबाबदारी देण्यात आली. महिला क्रिकेट निवड समितीत अमिता शर्मा या अध्यक्षा असतील. त्यांच्यासोबत सुलक्षणा नाईक, श्रवणती नायडू, श्यामा डे आणि जया शर्मा या सदस्य म्हणून काम पाहतील. तर एस. शरथ यांची ज्युनियर निवड समितीचे चेअरमन म्हणून नियुक्ती झाली आहे.वार्षिक सर्वसाधारण सभेत (अउश) निवड समित्या ठरवण्याबरोबरच बीसीसीआयने एक महत्त्वाचा निर्णय घेतला. आता अंडर-१६ खेळाडू आयपीएलमध्ये खेळू शकणार नाही, जोपर्यंत तो रणजी ट्रॉफीत आपल्या राज्यासाठी किमान एक सामना खेळत नाही. या नियमामुळे तरुण खेळाडूंना केवळ टी२०च नाही, तर रणजीसारख्या कसोटीमानाच्या स्पर्धेत सहभागी व्हावे लागेल. यामुळे त्यांच्या कौशल्यात अधिक प्रगल्भता येईल.
याच बैठकीत बीसीसीआयच्या नव्या अध्यक्षपदासाठी निवड झाली आणि मिथुन मन्हास यांना ही महत्त्वपूर्ण जबाबदारी देण्यात आली. ते पुढील तीन वर्ष या पदावर राहतील. याशिवाय देवजीत सैकिया हे सचिव, तर राजीव शुक्ला उपाध्यक्ष पदावर कायम राहणार आहेत.
माजी वेगवान गोलंदाज रुद्र प्रताप सिंग याने भारतासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये अनेक वर्षे क्रिकेट खेळले आहे. त्याने टीम इंडियासाठी १४ कसोटी, ५८ एकदिवसीय आणि १० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले, ज्यामध्ये कसोटी ४०, एकदिवसीय ६९ आणि टी-२० मध्ये १५ विकेट्स घेतल्या आहेत. २००७ च्या टी-२० वर्ल्ड कप विजेत्या संघाचा तो भाग होता. याव्यतिरिक्त, त्याने ९४ प्रथम श्रेणी सामने, १३६ लिस्ट ए सामने आणि १३२ टी-२० सामने खेळले. ३९ वर्षीय आरपी सिंगने २०११ मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. सध्या तो समालोचनात दिसतो आणि आता तो टीम इंडियाच्या निवडीत महत्त्वाची भूमिका बजावली. प्रज्ञान ओझाने तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतासाठी क्रिकेट खेळले आहे. त्याने २००८ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि २०१३ मध्ये त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. फिरकी गोलंदाज ओझाने भारतासाठी २४ कसोटी, १८ एकदिवसीय आणि ६ टी-२० सामने खेळले, ज्यामध्ये त्याने कसोटी ११३, एकदिवसीय २१ आणि टी-२० मध्ये १० विकेट्स घेतल्या.

## सूर्यकुमार यादवने फायनल मॅचपूर्वीच्या फोटोशूटवरही टाकला बहिष्कार; पाकिस्तानचा कर्णधार म्हणाला, आमच्यावर दबाव



दिल्ली-आशिया चषक २०२५ चा विजेता कोण? याची उत्सुकता आता क्रिकेट चाहत्यांना लागली आहे. आशिया चषकात ४१ वर्षानंतर पहिल्यांदाच भारत आणि पाकिस्तान आमनेसामने येत आहेत. याआधी भारताने पाकिस्तानला याच चषकात दोन वेळा पराभूत केलेले आहे. त्यामुळे पाकिस्तानचा संघ या सामन्यात पूर्ण ताकदीनिशी उतरेल, असे पाकिस्तानचे माजी खेळाडू सांगत आहेत. तर भारतानेही पाकिस्तानला तिसऱ्यांदा पराभव भेट देण्याची तयारी केली आहे. तत्पूर्वी अंतिम सामन्यापूर्वी होणाऱ्या फोटोशूटसाठी भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवनं नकार दिला आहे. हस्तांदोलन टाळल्यानंतर सूर्यकुमारनं फोटोशूटही टाळले आहे. यानंतर पाकिस्तानच्या संघाचा कर्णधार सलमान अली आगा यानं प्रतिक्रिया दिली. आजच्या भारत-पाकिस्तान सामन्यावर अनेकांच्या नजरा आहेत. हा सामना आता फक्त क्रिकेटपुरता मर्यादीत राहिला नसून पाकिस्तानी खेळाडूंनी केलेल्या हातवारे आणि शाब्दिक प्रतिक्रियांमुळे त्याला राजकीय रंगही लागला आहे. पाकिस्तान संघाचा कर्णधार सलमान आगाने म्हटले, मफआमच्या संघावर दबाव आहे. तसा भारतीय संघावरदेखील दबाव आहे. फक्त एकच संघ दबावात असल्याचे कुणी म्हटले तर ते चुकीचे ठरेल.फ्फ आधीच्या दोन सामन्यात पराभव पत्करूनही तिसरा सामना आम्ही नक्की जिंकू, असा विश्वास सलमानने व्यक्त केला. भारताच्या बाजूने आकडेवारी असली किंवा भारताचा संघ अधिक फॉर्मात असला तरी पाकिस्तानच्या विजयाबाबत सलमान आगा आशावादी आहे. मफआम्ही जिंकू. आमचा प्रयत्न सर्वोत्तम क्रिकेट खेळण्याचा आहे. आम्ही सर्वोत्तम क्रिकेट खेळलो आणि ४० षटकात आमच्या योजना योग्यरितीने अमलात आणल्या तर आम्ही नक्कीच भारताचा पराभव करू शकूफ्फ, असा विश्वास सलमान आगाने सामन्यापूर्वी बोलताना व्यक्त केला. एनडीटीव्ही स्पोर्ट्सने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.
भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने फोटोशूटवर टाकलेल्या बहिष्काराबाबत बोलताना सलमान आगा म्हणाला, मफत्याला फोटोशूटसाठी याचे की नाही, हा निर्णय सर्वस्वी सूर्यकुमारचा आहे. मी त्यात काहीच करू शकत नाही.फ्फ पाकिस्तान संघाबरोबर आमची तुल्यबळ स्पर्धा नाही, असे विधान सूर्यकुमार यादवने दुसऱ्या सामन्यानंतर केले होते. या विधानावर बोलताना सलमान आगा म्हणाला, मफआम्ही आधीच्या दोन सामन्यात भारताहून अधिक चुका केल्या आहेत. त्यामुळेच आम्हाला विजय मिळू शकला नाही. आज जो कमीतकमी चुका करेल, तो सामना जिंकेल.

## आशिया कप जिंकूनही विजयाची ट्रॉफी का मिळत नव्हती, पाकचे घृणास्पद राजकारण समोर



दुबई : भारताने आशिया कप जिंकला. पाकिस्तानची फायनलमध्ये चांगलीच जिरवली. भारताने दमदार विजय साकराला. पण विजयानंतरही एक तास झाला तरी भारतीय संघाला विजयाची ट्रॉफी मिळाली नव्हती. यावेळी घृणास्पद राजकारण पाकिस्तानने मैदानात समोर आल्याचे पाहायला मिळाले.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील फायनलचा सामना झाला. आता भारत आशिया कपची ट्रॉफी उंचावेल, असे सर्वांना वाटत होते. पण तसे घडले मात्र नाही. कारण सामना संपल्यावर एक तास गेला. खेळाडूंच्या मुलाखतीही झाल्या होत्या, पण तरीही मैदानात विजयाची ट्रॉफी मात्र भारतीय संघाला दिली जात नव्हती. कारण ठरले ते पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी.

मोहसिन नक्वी हे आशिया क्रिकेट संघटनेचेही अध्यक्ष आहेत. त्यामुळे मोहसिन नक्वी यांच्या हातून विजयाची ट्रॉफी दिली जाणार होती. पण भारताने यावेळी त्यांच्या हातून ट्रॉफी घेण्यात नकार दिला होता. त्यामुळे भारत मोहसिन नक्वी यांच्या हातून ट्रॉफी स्विकारणार नव्हता. मोहसिन नक्वीही यावेळी अडून बसले होते. त्यामुळे एक तास विजयानंतरही भारताला विजयाची ट्रॉफी मिळू शकली नव्हती.स्पर्धेच्या करंडक अनावरण सोहळ्यावेळी भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने नक्वी आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगा यांच्याशी हस्तांदोलन केले होते. त्यावेळी अनेकांनी सूर्यावर टीका केली होती. आता स्पर्धेच्या सांगता दिनी नक्वी यांच्याशी हस्तांदोलन करण्याबाबत भारतीय संघव्यवस्थापनाने आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.


**भारताने आशिया कप जिंकला. पण त्यानंतर एक तास झाला तरीही भारताला विजयाची ट्रॉफी काही केल्या मिळत नव्हती. कारण त्यावेळी पाकिस्तानचे राजकारण समोर आले.**

नक्वी हे नेहमीच भारतविरोधी वक्तव्ये करतात. आशिया स्पर्धेच्या वेळीही त्यांनी हीच भूमिका कायम ठेवली होती.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील साखळी सामन्यात सूर्यकुमारने पाकिस्तानच्या कर्णधारासोबत हस्तांदोलन करणे टाळले होते. त्यानंतर पाकिस्तानने सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना लक्ष्य केले. त्यावेळी नक्वी यांची भूमिका खूप महत्त्वाची होती. नक्वी यांच्या दबावामुळेच पाकिस्तानने सूर्यकुमारविरुद्ध तक्रार केली होती. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख केल्याबद्दल सूर्यकुमारला कठोर शिक्षा व्हावी, यासाठीही त्यांनी प्रयत्न केले होते.

शाहांच्या लेकाला पाकचा पुळका का? भारत-पाक सामन्यावरुन नागरिकांनी सुनावलं!

नक्वी शनिवारी रात्री दुबईत येण्याची शक्यता आहे. ते आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्या हस्ते बक्षीस समारंभ होईल. भारतीय क्रिकेट बोर्ड काय निर्णय घेईल, हे आताच सांगता येणार नाही, असे स्पर्धा संयोजन समितीतील एका वरिष्ठ सदस्याने सांगितले. नक्वी यांनी यापूर्वी रौफसारखेच कृत्य



# नावीन्यपूर्ण,समाजोपयोगी व उच्च दर्जाचे संशोधन केले पाहिजे - दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड

**लातूर/प्रतिनिधी :** उच्च दर्जाचे संशोधन करणे ही आधुनिक काळाची गरज असून प्रत्येक प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण संशोधन केले पाहिजे.भारतीय संशोधनाचा दर्जा पाश्चिमात्य देशांपेक्षा जागतिक स्तरावर सर्वोत्तम असला पाहिजे.आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना दिली पाहिजे.पदवीच्या प्रथम वर्षांपासून संशोधन करायला सुरुवात केली पाहिजे.संशोधनासाठी शासनाच्या विविध फंडिग सुविधा आहेत,त्याचा लाभ घ्यावा,पेंटट मिळवावे.नावीन्यपूर्ण, समोजोपयोगी व उच्च दर्जाचे संशोधन प्रत्येकांनी केले पाहिजे,असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी (एडिओ) प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२६ सप्टेंबर २०२५ रोजी पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय,राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धा -२०२६ च्या पूर्व तयारीच्या दृष्टीने महाविद्यालयस्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.या स्पर्धेचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे,दयानंद फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,आविष्कार स्पर्धा समन्वयक व संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,आविष्कार स्पर्धा सदस्य डॉ.विश्वनाथ मोटे डॉ.महादेव पंडगे,डॉ.महेश करळे,डॉ.अमोल ठोसर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महाविद्यालयस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत एकूण १५० स्पर्धकांनी आपले इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट सादर केले तसेच यावेळी संशोधक विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर तयार केलेल्या प्रोजेक्ट,पोस्टर मॉडेलचे संस्थेचे एडिओ प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व सर्व विभाग प्रमुख,विविध विभागातील प्राध्यापकांनी निरीक्षण केले.सर्वांनी विद्यार्थ्यांनी तयार



केलेले प्रोजेक्ट हे त्यांची संशोधन वृत्ती वाढविण्याच्या दृष्टीने व समाजोपयोगी संशोधनासाठी निश्चितच महत्त्वाचे आहेत,असे कौतुक केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील सर्व विद्यार्थी,संशोधक व प्राध्यापकांचा संशोधनाचा दर्जा वाढावा म्हणून महाविद्यालयात सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात.विद्यार्थी व प्राध्यापकांनी नवनवीन प्रयोग करून उच्च दर्जाचे संशोधन केले पाहिजे. संशोधनातला आविष्कार लातूर पॅटर्न दयानंद विज्ञान महाविद्यालय व संस्था भविष्यात निश्चित घडवेल,असे ते म्हणाले.

सदरील स्पर्धेचे परीक्षक म्हणून कॉमर्स,मॅनेजमेंट अॅन्ड लॉ शाखेसाठी दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील डॉ.साईनाथ उमाटे,भाषा आणि ललित कला शाखेसाठी प्रा.मेघा पंडित व डॉ.रामशेट्टी शेटकार,प्युवर सायन्स शाखेसाठी डॉ.युवराज सारणीकर व डॉ.राहुल मोरे,ॲग्रिकल्चर अॅन्ड ॲनिमल हसबंडरी शाखेसाठी डॉ. रवी सोळुंके व प्रा.शिवाजी आळणे, इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी शाखेसाठी डॉ.टी.एच.मुजावर व डॉ. शंकर बिराजदार,मेडिसिन अॅन्ड फार्मसी शाखेसाठी डॉ.रवींद्र शिंदे व डॉ.कोमल गोमारे यांनी उत्कृष्टरित्या काम पाहिले.

प्रास्ताविक डॉ.महादेव पंडगे यांनी केले तर डॉ.अमोल ठोसर यांनी मानले.सूत्रसंचालन गौरी जाजू व आकांक्षा पाटील यांनी संयुक्तपणे केले.यावेळी स्पर्धेत प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या संशोधक विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.या आविष्कार स्पर्धेसाठी महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि संगणकशास्त्र फोरमचे विद्यार्थी यांचेही सहकार्य लाभले.

## सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत अहमदपूर तालुक्यातील चिलखा येथील अडकलेल्या तीन मजुराची सुखरूप सुटका



**अहमदपूर/प्रतिनिधी :** तालुक्यात रात्रीपासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडून अतिवृष्टीमुळे अहमदपूर तालुक्यातील चिलखा येथे बंधाऱ्यावर काम करणारे तीन मजूर अडकले होते. या घटनेची माहिती मिळताच राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्याशी संपर्क करून एनडीआरएफ यांची टीम त्या ठिकाणी रवाना केली होती. राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील स्वतः प्रचंड पावसामध्ये चिलखा येथे दाखल होऊन ते मजूर सुखरूप बाहेर निघेपर्यंत ना. पाटील यांनी त्या ठिकाणी ठाण मांडून बसले होते.

पहाटे पाच पासून अडकलेल्या मजुराची प्रशासनाने दुपारी १२.०० वाजता प्रशासनाने लातूर येथील एनडीआरएफ प्रशासनाचे ०९ कर्मचारी, अहमदपूर येथील अग्निशमन दल विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने त्यांची सुखरूप सुटका केली. यावेळी उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, पोलीस निरीक्षक भुसनर, लघु पाटबंधारे विभागाचे पवार, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक सह विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते...

## राष्ट्रीय वेलनेस क्राफ्ट-२०२५ स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूटची कु. सुजाता भालके प्रथम



**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर तर्फे ''वेलनेस क्राफ्ट नॅशनल लेव्हल पेशंट काउन्सेलिंग व्हिडिओ क्लिप स्पर्धा-२०२५'' चे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. या स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या तृतीय वर्ष बी. फार्मसीची विद्यार्थिनी कु. सुजाता भालके व तिच्या संघात श्रद्धा देशमुख, शिवम गर्जे, रोमन शेख यांचा समावेश होता. या संघाने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवत संस्थेचे नाव गौरवले. उत्कृष्ट ज्ञान, संवादकौशल्य आणि रुग्ण मार्गदर्शनातील तिची प्रखर बांधिलकी यामुळे हे यश शक्य झाले असून या यशामागे प्रा. सुषमा पांचाळ यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. अरविंदजी सोनवणे, मा. ललितभाई शहा, मा. रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा आदी मान्यवर पदाधिकारी यांनी सुजाता भालके तसेच सर्व विजयी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन केले.

## भारताचं टेन्शन वाढलं! सर्व मॅच जिंकून देणारा स्टार खेळाडू जखमी

**मुंबइ/प्रतिनिधी :** आशिया कप २०२५ चा महामुकाबला २८ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळला जाणार आहे. क्रिकेटप्रेमी या हायव्होल्टेज सामन्याची आतुरतेने वाट पाहत असताना टीम इंडियासाठी एक काळजीची बातमी समोर आली आहे. सुपर-४ टप्प्यात श्रीलंकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या अखेरच्या सामन्यात दोन महत्त्वाचे खेळाडू म्हणजे हार्दिक पांड्या आणि अभिषेक शर्मा मैदानाबाहेर जावे लागले. त्यांच्या दुखापतीमुळे आता अंतिम सामन्यापूर्वी संघाच्या स्ट्रॅटेजीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सुपर-४ चा अखेरचा सामना भारताने श्रीलंकेविरुद्ध खेळला. हा सामना शेवटच्या क्षणापर्यंत रंगला आणि अखेरीस भारताने सुपर ओव्हरमध्ये विजय मिळवला. मात्र, या सामन्यात हार्दिक पांड्या आणि अभिषेक शर्मा हे दोन्ही खेळाडू दुखापतीमुळे मैदान सोडताना दिसले. हार्दिक पांड्याने सामन्याची सुरुवात जोरदार केली होती.



औद्योगिक प्रशिक्षण संस्था निलंगा येथील सेवा योजना चे स्वयंसेवक यांच्यामार्फत दापका भवानी येथे स्वच्छता ही सेवा अंतर्गत स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे प्राचार्य श्री राजूरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली गटनिदेशक श्री पांचाळ सर, कार्यक्रम अधिकारी श्री कादरी जे एम, शिल्प निदेशक श्री सूर्यवंशी सर, श्री गायकवाड सर, थोरात सर, ढाले सर व सर्व स्वयंसेविका व स्वयंसेवक उपस्थित होते.

## सावधान.. अतिक्रमण करणाऱ्यांना आता सुट्टी नाहीच !

**पुणे/प्रतिनिधी :** शहरातील विविध रस्त्यांवर होणाऱ्या बेकायदा अतिक्रमणांमुळे अनेक भागात वाहतूक कोंडी निर्माण होते. पदपथांवर अनधिकृतपणे पथारी व्यावसायिक बसतात. दुकानदारांनी तसेच हॉटेल चालकांनी दुकानाच्या समोरील आणि आजूबाजूच्या मोकळ्या जागेत (फ्रंट व साइड मार्जिनमध्ये) बांधकाम केल्याचे समोर आले आहे.

या बेकायदा पद्धतीने करण्यात आलेल्या अतिक्रमणांवर तसेच बांधकामांवर कडक कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत. या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय अधिक्रमण तसेच बांधकाम विभागाने घेतला आहे. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयासह मुख्य विभागाच्या वतीने अतिक्रमणांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत असलेले फुटपाथ, रस्त्यावर, तसेच दुकानासमोरील आणि आजूबाजूच्या जागेत झालेल्या बांधकामावर कारवाई करण्यात आली.

## मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीत नागरिकांनी सतर्क राहावे - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि पूर परिस्थितीत नागरिकांनी जिल्हा प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. काल रात्री पासून सुरू असलेल्या सततच्या पावसाने धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले आहे.



नागरिकांनी कोणतेही धोकादायक प्रवास किंवा शेतीची कामे टाळावीत. आपल्या कुटुंबाची आणि गाव-शहराया सुरक्षेसाठी करण्यासाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. जिल्हा प्रशासन सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या माध्यमातून तातडीची मदत पुरवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जळकोट तालुक्यातील बेलसांगवी येथे पाण्याचा वेढा पडलेल्या कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अहमदपूर येथील चिलखा बॅरेजवर अडकलेल्या मजुरांची स्थानिक बचाव पथक आणि पोलिसांनी यशस्वीपणे सुटका केली आहे, असे पालकमंत्री म्हणाले.

शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी घाबरून न जावू नये. पाऊस कमी झाल्यानंतर शेती, जमीन, घर आणि जनावरांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने केले जातील. राज्य शासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सर्वतोपरी मदत उपलब्ध करून दिली जाईल, अशी पालकमंत्र्यांनी दिली. एकही नुकसानग्रस्त मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# ७२ तास अखंड संगीत महायज्ञाचे शानदार उद्‌घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटर, सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर आणि श्री.ज्ञानसरस्वती मंदीर संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित '' ७२ तास अखंड संगीत महायज्ञाचे'' उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.ना.बाबासाहेब पाटील साहेब यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून झाले. याप्रसंगी आयोजक तालमणी डॉ. राम बोरगावकर,सुरमणी पं.बाबुराव बोरगावकर तसेच सन्माननीय अतिथी म्हणून द्वारकादास शामकुमारचे संचालक श्री. तुकारामभैया पाटील, श्री.राजाभाऊ पाटील,आर. सी.सी.क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, अॅड. दासराव शिरूरे , ग्लोबल नॉलेज स्कूल चे संचालक श्री. रमेश बिरादार,प्राचार्य डॉ.हरिदास फेरे,प्राचार्य बाबुराव जाधव,श्री.प्रकाश देशमुख,प्रा. सुरी सर उपस्थित होते. सर्व पाहुण्यांचे स्वागत आयोजक तालमणी डॉ.राम बोरगांवकर आणि सुरमणी पं. बाबुराव बोरगांवकर यांनी केले.

संगीत साधना करताना समर्पण महत्त्वाचे असते, समर्पण असेल तरच संगीत शिकायला आणि ऐकायला गोड वाटते असे प्रतिपादन सहकार मंत्री मा.ना. बाबासाहेब पाटील यांनी केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, कलियुगात माणसाचा उद्धार संगीत साधनेतून, किर्तन व भजनातून होतो. दोन तास गायनासाठी अठरा-अठरा तास रियाज करावा लागतो. बोरगावकर परिवाराने गायन-वादन यांची उपासना करून संगीत परंपरा जोपासली आहे . असे मनोगत सहकार मंत्री ना. श्री. बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

या संगीत महोत्सवाच्या प्रारंभी सरस्वती संगीत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी श्री गणेश स्तवन,सरस्वती स्तवन,दत्त स्तवन, चिन्मयानंद स्वामी स्तवन गायले त्यानंतर रुद्र देशमुख या बाल कलावंताने राग मालकंस सादर करून रसिकांची उत्स्फूर्त दाद घेतली.




त्यानंतर प्रा.लक्ष्मण श्रीमंगले यांनी '' काया ही पंढरी,आत्मा हा विठ्ठल'' व ''देव देव्हाऱ्यात नाही'' हे भजन गाऊन रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.याप्रसंगी ग्लोबल नॉलेज स्कूल,लातूर च्या विद्यार्थ्यांनी सरस्वती स्तवन अतिशय तयारीने सादर केले.

मुंबई येथील सुप्रसिद्ध सितारवादक पं. मारुती पाटील यांनी विलंबित गत ताल झपताल घेतली व त्यानंतर द्रुतगत ताल तीनताल मध्ये त्यांनी सुरतालाशी जुगलबंदी केली.त्यांना श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली. त्यांना तबलासंगत तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनी केली.यानंतर मुंबई येथील गायक श्री.नागनाथ पाटील यांनी संतवाणी सादर करून रसिकांची उत्स्फूर्त दाद घेतली.त्यांना तबलासंगत जीवन पांचाळ यांनी केली.यावेळी जीवन पांचाळ यांनी राग बागेश्री बडाख्याल सादर केला.त्यांना तबला साथ प्रा.राजेंद्र भोसले यांनी केली तर हार्मोनियम साथ प्रा.लक्ष्मण श्रीमंगले यांनी केली.

या ७२ तास अखंड संगीत महायज्ञाचे उद्गाता तालमणी डॉ.राम बोरगांवकर प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, याठिकाणी मागील १७ वर्षापासून नवरात्रोत्सवानिमित्त ७२ तास अखंड संगीत महायज्ञ हा उपक्रम सुरु असल्याचे त्यांनी यावेळी नमुद केले. यातून संगीत कलेच्या प्रचार, प्रसाराबरोबरच उदयोन्मुख कलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य घडते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. सुदाम पवार आणि प्रा.विश्वनाथ स्वामी यांनी केले तर आभार प्रा.बालाजी शिंदे यांनी मानले. याप्रसंगी लातूर शहर आणि परिसरातील रसिक-श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंडित दीनदयालजी उपाध्याय यांची जयंती साजरी

**निलंगा/आयुब बागवान:** २५ सप्टेंबर २०२५ रोजी पंडित दीनदयालजी उपाध्याय यांची जयंती शहीद श्रीधर चव्हाण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था निलंगा येथे साजरी करण्यात आली, या प्रसंगी प्रमुख वक्ते मा. श्री. परमेश्वर जी हासबे ( माजी सिनेट सदस्य स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड) पंडित दीनदयाल एकात्मता मानव दर्शन ह्या विषयावर व्याख्यान दिले, तसेच मा.श्री नरसिंग झरे ( सचिव भटक्या विमुक्त विकास परिषद महाराष्ट्र राज्य) व मा. श्री. दत्तात्रेयजी पांढरे ( आय एम सी सदस्य आयटीआय निलंगा )यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले, संस्थेचे प्राचार्य मा. श्री. हर्षद राजुरकर साहेब, गटनिदेशक श्री पांचाळ सर,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री कादरी सर




व सर्व कर्मचारी उपस्थित होते, पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी कार्यालय लातूर व राष्ट्रीय सेवा योजना औद्योगिक प्रशिक्षण संस्था निलंगा यांच्यामार्फत संस्थेत रक्तदान शिबिर पार पडले, संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी संस्थेचे प्राचार्य श्री. हर्षद राजूरकर साहेब यांनी ६१ वी वेळी रक्तदान केले, त्यांच्या प्रेरणेतून श्री. थोरात सर, कुलट सर, दडपे सर, कलाने सर, व प्रशिक्षणार्थ्यांनी रक्तदान केले,

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात विद्यार्थी प्रबोधन कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन



धाराशिव (प्रतिनिधी)- श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव येथे विद्यार्थी प्रबोधन कार्यक्रम (Student Induction Program) उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या वतीने करण्यात आले होते. महाविद्यालयीन नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना विविध विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची ओळख व्हावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंगेश भोसले (समन्वयक, IQAC) यांनी केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनातून महाविद्यालयातील शैक्षणिक विकासाचा आढावा सविस्तरपणे मांडला

यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील सपोर्टिंग डिपार्टमेंट्सची माहिती करून देण्यात आली. यामध्ये ऑफिस, आविष्कार, छउउ व माजी विद्यार्थी संघटना, NSS व करिअर कट्टा, सांस्कृतिक, क्रीडा, वाचनालय, महिला सक्षमीकरण कक्ष व महिला वसतिगृह, प्लेसमेंट व करिअर मार्गदर्शन कक्ष व पुरुष वसतिगृह, परीक्षा विभाग, मेंटर-मेंटी योजना, शिष्यवृत्ती विभाग आदी विभागांचा परिचय संबंधित शिक्षकांनी करून दिला.

कार्यक्रमात प्रा. माधव उगीले यांनी आभार प्रदर्शन केले, तर सुत्रसंचालन डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी केले.

कार्यक्रम स्थळ म्हणून डॉ. बापूजी साळुंखे क्रीडा व सांस्कृतिक भवन (जिमखाना) येथे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनातील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक संधींची जाणीव झाली. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# युवकांनी आपले आदर्श कोण तपासा आणि कष्टला प्रयत्नाची जोड द्या तुम्हीच तुमच्या यशाचे शिल्पकार व्हाल : प्रा. डॉ. प्रीती शिंदे



मुरूम (सुधीर पंचगल्ले)- आजची पिढी आपला हिरो किवा आदर्श कोणाला मानतात हे कळतच नाही. त्यासाठी आपले आदर्श कोण हे तपासायला पाहिजे. तरच कष्ट करायची जाणीव होईल. आणि त्या कष्टाला सरावाची आणि प्रयत्नाची जोड दिली तरच युवक स्वतःच स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार बनतील. प्रचंड कष्ट करण्याची तयारी, प्रयत्नातील सातत्य आणि वाचनाचा सराव हे चार आधारस्तंभ युवकांना स्वतःच त्यांचे जीवन घडवण्यासाठी शिल्पकार म्हणून तयार करतील असे मत वारणानगर येथील प्रा. डॉ. प्रीती शिंदे यांनी व्यक्त केले. शनिवार दिनांक २७ सप्टेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित कर्मयोगी श्रीधररावजी मोरे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्पगुंफताना त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. सुभाषराव वाघमोडे होते. प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव याची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. प्रीती शिंदे म्हणाल्या की जीवन सुंदर आहे आणि ते अधिक सुंदर घडविण्यासाठी युवकांना स्वतःला शिल्पकाराची भूमिका पार पाडावी लागेल, त्यासाठी प्रचंड कष्टाची तयारी ठेवून प्रयत्नातील सातत्य हेच तुम्हाला ध्येय सिद्धी पर्यंत पोहचवू शकतात. कष्टाच्या घामाने आंघोळ करणारा माणूस स्वतःचे जीवन घडवू शकतो. अध्यक्षिय समारोप करताना डॉ. सुभाष वाघमोडे यांनी समाज परिवर्तनासाठी वैचारिक प्रबोधनाची गरज यावेळी त्यांनी व्यक्त केली. उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, डॉ. अशोक पदमपल्ले, शहरातील नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज ईटले यांनी केले तर डॉ. डी. बी. ढोबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# तुळजाभवानीच्या मंदिराकडून पूरग्रस्तांना एक कोटींचा दिलासा

धाराशिव (जिमाका)- मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीने अनेक गावांमध्ये हाहाकार उडाला आहे.शेतातलं पीक वाहून गेली, जनावरांचे हाल झाले,अनेकांच्या घरांमध्ये पाणी शिरले आणि असंख्य कुटुंबे बेघर झाली. अशा संकटाच्या काळात श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिराने हात पुढे करून हजारो पूरग्रस्तांच्या डोळ्यात दिलासा आणला आहे.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने मुख्यमंत्र्यांच्या सहाय्यता निधीसाठी तब्बल १ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे.मंदिर संस्थानचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी हा निर्णय घेतला असून, तात्काळ रक्कम शासनाकडे सुपूर्द करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

गेल्यावर्षीही अतिवृष्टीच्या काळात मंदिर संस्थानने २५ लाख रुपयांची मदत दिली होती.परंपरेप्रमाणे, संकटाच्या काळात श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान समाजकार्याचे व्रत अखंडपणे पार पाडत आहे.

जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे पीक पाण्याखाली गेले,जनावरांचा चारा गेला,घरांची पडझड झाली.या सर्व परिस्थितीत 'आई तुळजाभवानी 'च्या मंदिरातून आलेली १ कोटी रुपयांची मदत ही फक्त आर्थिक नाही,तर पूरग्रस्तांना भावनिक आधाराची देणगी आहे.

आई तुळजाभवानी संकटात नेहमीच आपल्या लेकरांना धीर देत आली आहे.हे योगदानही त्याच मायेचा एक भाग आहे, असे सांगत संस्थानने पूरग्रस्तांसोबत एकात्मता व्यक्त केली.

# केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडून पीक नुकसानीचा आढावा



धाराशिव (जिमाका)- केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यात या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांच्या नुकसानीच्या आणावा घेतला यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महिला कघोष पोलीस अधीक्षक रितू खोखार निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती

श्री.आठवले यावेळी म्हणाले की, अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीने बाधित झालेली कोणताही व्यक्ती ही मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.पीक नुकसानीचे पंचनामे करण्यात यावे.केंद्र सरकारकडून बधितांना मदत मिळाली रिरिहळक्षश, यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री.पुजार यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीची यावेळी माहिती दिली.सप्टेंबर महिन्यात आलेल्या झालेल्या अतिवृष्टीमुळे २ लक्ष २६ हजार ७०६ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून १०३७ घरांची अंशतः पडझड झाली आहे.२०७ जनावरांचा मृत्यू झाला असून सर्वाधिक नुकसान भूमी,परंडा व वाशी तालुक्यात झाले आहे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

या आढावा सभेला सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.केत, प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.आसलकर, वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री.आडे,पशुसंवर्धन विभागाचे उपआयुक्त श्री.घाटे,समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन केवले यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# सिना कोळेगाव धरणातून विसर्गात वाढ ; नागरिकांना सतर्कतेचा इशारा

धाराशिव (जिमाका) सिना कोळेगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातून होणाऱ्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे.आज सकाळी १० वाजल्यापासून ५० हजार क्युसेकवरून विसर्ग वाढवून ५५ हजार ४४० क्युसेक इतका करण्यात येणार आहे,अशी माहिती कार्यकारी अभियंता, सिना कोळेगाव प्रकल्प विभाग,परंडा यांनी दिली.

यामुळे सिना नदीच्या दोन्ही तीरांवरील शेतकरी व नागरिकांनी सावधगिरी बाळगावी,असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.पाण्याची आवक व पावसाचे प्रमाण लक्षात घेता विसर्गात आणखी बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# फार्मा सप्ताह २०२५ मोठ्या उत्साहात साजरा



धाराशिव (प्रतिनिधी)- जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आ. शि. प्र. मं. संचलित के. टी. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, धाराशिव येथे २२ ते २५ सप्टेंबर दरम्यान फार्मा सप्ताह २०२५ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . ढहळपज्ञ क्शरश्रींह, ढहळपज्ञ झहरीरलळीीं या संकल्पनेवर आधारित 'फार्मा आरोग्यम-२०२५ हा उपक्रम अनेकविध कार्यक्रमांनी संपन्न झाला.

या आठवड्यात विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि सृजनशीलतेला चालना देणाऱ्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल मेकिंग, फार्मा रंगोली, वादविवाद, क्विझ, हेल्दी फूड मेकिंग, ब्रेन हेल्थ, ड्रग-डिसीज गेस, फार्मा रील्स मेकिंग, तसेच जाहिरात सादरीकरण अशा आकर्षक स्पर्धांचा समावेश होता. जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी आधुनिक जीवनशैली व आहारातील बदलया विषयावर धाराशिव जिल्ह्यातील हृदय व मधुमेह रोग तज्ञ डॉ रमेश जावळे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सप्ताहाच्या अंतिम दिवशी सर्व स्पर्धांमध्ये विजेते व उप विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

या फार्मा सप्ताहामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, औषधशास्त्र आणि सामाजिक जबाबदारी याविषयी जागरूकता निर्माण झाली. या सप्ताहात विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद नोंदवून विविध कलागुणांचे प्रदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य, डॉ अमोल जोशी, प्रा. रामराजा उंबरे, प्रा. चित्रा हंगरगेकर, प्रा. नदीम खान इतर शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून यशस्वीपणे पार पडला.

# बस स्थानकातील दुकानदारांच्या भाड्यावरती आकारण्यात येणारी १८ % जीएसटी कमी करा

कळंब (प्रतिनिधी)- राज्यातील सर्वच बस स्थानकावर ती असलेल्या आस्थापनाधारक यांच्या भाड्यावरती आकारण्यात येणारी १८ % जीएसटी परिवहन विभागाने कमी करावी अशी मागणी कळंब येथील बस स्थानकातील आस्थापनाधारकाने आगार प्रमुख यांच्यामार्फत विभाग नियंत्रक व परिवहन मंत्री यांना पाठवलेल्या निवेदनात केली आहे .अशा आशियाचे निवेदन कळंब चे आगार प्रमुख एस. डी. खताळ यांना दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की केंद्र व राज्य सरकारने विविध वस्तू व सेवा यांचे वरील जीएसटी कमी केलेला आहे . मात्र राज्य परिवहन महामंडळाने आस्थापना भाड्यावरील कुठल्याही पद्धतीने जीएसटी कमी केलेला दिसत नाही. सध्या मराठवाड्यासह इतर जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे शेतीमालासह इतर व्यवसायिकांचे फार मोठे नुकसान झालेले आहे . त्यामुळे बाजारपेठेत सर्वत्र सध्या शुकशुकाट आहे त्यातच भाड्यावर १८% जीएसटी भरणे व्यापाऱ्यांना मुश्किल झाले आहे . तरी परिवहन विभागाने याकडे सकारात्मक दृष्टीने पाहून व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणीही या निवेदनात केली आहे . या निवेदनावर आस्थापनाधारक रुपेश कोठावळे ,सोमनाथ सुरवसे , दत्तात्रय उमाप , सदाशिव घिसरे, विकास मुळीक, दिलीप चाळक ,बाळासाहेब चोरघडे , राजाभाऊ चाळक सह आदींच्या


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **MULANI MAHMADSARFRAJ JAINUDDIN**. TO: **MOHAMMAD SARAFARAZ ZAINODDIN MULANI.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **MOHAMMAD SARAFARAZ ZAINODDIN MULANI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MULANI MAHMADSARFRAJ JAINUDDIN.**
NEW NAME:- **MOHAMMAD SARAFARAZ ZAINODDIN MULANI.**
Address :- SAMTA NAGAR, NEAR SAMBHAJI UDYAN, OSMANABAD.413501.
Adhar no.-731858363524
Mob. No.-9881702877

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **RAFIK NASIRODDIN SHAIKH.** TO: **RAFIK NASRUDDIN SHAIKH.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **RAFIK NASRUDDIN SHAIKH** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **RAFIK NASIRODDIN SHAIKH.**
NEW NAME:- **RAFIK NASRUDDIN SHAIKH.**
Address :- 13/13/3088 C, GALLI NO.-28, KHAJA NAGAR OSMANABAD. -413501.
Adhar no.-670628040698.
Mob. No.-7972670016.



## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649